सेव्हींग व करंट खात्यांवर मिळवा 7% व्याजदर
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. २७.०६.२०२६ | अंक नं. ०७५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
सौ. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ अँड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर. फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

रु. 2000 पासुन बेबी टॉप्स / 1000 पेक्षाही अधिक डिझाईन्स
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
₹ ९९९/-*
Conditions Apply*

# अहिल्यानगर दुय्यम निबंधक कार्यालयात अंधार; विजेअभावी कामकाज ठप्प; लाखोंच्या निधीनंतरही सुविधा शून्य; वकिलांचा नाराजी व्यक्त करत 'एल्गार'

नगर - नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाच्या सहदुय्यम निबंधक अहिल्यानगर-३ या कार्यालयात विजेअभावी कामकाज ठप्प ठेवण्याची वेळ येत आहे. त्यामुळे गेल्या सहा महिन्यांपासून नागरिक आणि वकिलांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. कार्यालयीन सुविधेसाठी तब्बल १० लाख रुपयांचा निधी खर्च होऊनही येथे साध्या मूलभूत सुविधाही मिळालेल्या नाहीत. २७ जून रोजी कार्यालयात विजेअभावी सर्व कामकाज ठप्प झाल्याने संतप्त झालेल्या वकिलांनी थेट प्रभारी दुय्यम निबंधक राहुल उगलमुगले यांना धारेवर धरत प्रश्नांची सरबत्ती केली. या गोंधळामुळे कार्यालयातील अनागोंदी कारभार चव्हाट्यावर आला आहे.

शनिवार आणि रविवारी नोंदणीची प्रक्रिया ठप्प राहू नये म्हणून शासनाने हे कार्यालय सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत (त्याऐवजी मंगळवार व बुधवार हे कार्यालय बंद असते). मात्र, शनिवारी वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर येथील यंत्रणा पूर्णपणे कोलमडते. कार्यालयात जनरेटरची व्यवस्था असूनही त्याची बॅटरी खराब झाल्यामुळे ते धूळ खात पडून आहे. त्यातच इन्व्हर्टरचीही कोणतीही पर्यायी सोय नसल्याने संपूर्ण दिवसभर कामकाज ठप्प राहिले. जिल्हाभरातून दस्त नोंदणीसाठी आलेल्या नागरिकांना अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी 'लाईट गेलेली आहे, ४ वाजता या', असे सांगून थेट बाहेरचा रस्ता दाखवला. तरीही कर्जत, पारनेर, श्रीगोंदा येथून आलेले काही नागरिक तेथेच थांबून होते. कर्जत येथून आलेल्या वृद्ध आजीदेखील दुय्यम निबंधक कार्यालयातील अंधार पाहून संताप व्यक्त करत होत्या. त्यांनाही दिवसभर तेथेच ताटकळत बसावे लागले.




नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाच्या सहदुय्यम निबंधक अहिल्यानगर-३ या कार्यालयातील अनागोंदी कारभाराविरोधात वकिलांनी २७ जून रोजी आंदोलन केले. (छाया - लहू दळवी)

या दुरावस्थेविरोधात शहरातील वकिलांनी आक्रमक पवित्रा घेत निबंधक कार्यालयातच एल्गार पुकारला. ॲड. संदीप पाखरे आणि ॲड. पराग काळे यांच्यासह उपस्थित वकिलांनी प्रशासनावर गैरव्यवहाराचे आरोप केले. वकिलांनी विचारले की, 'कार्यालयीन सुविधेसाठी १० लाख रुपये खर्च करण्यात आले, मग लोकोपयोगी सुविधा कुठे आहेत? हे दहा लाख रुपये नेमके कोणाच्या खिशात गेले'?

### 'ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाईट कारभार' ; नागरिकांची लूट

इतर सर्व कार्यालयांमध्ये कलर प्रिंटरची अद्ययावत व्यवस्था असताना, अहिल्यानगर-३ कार्यालयात मात्र अद्यापही कलर प्रिंटर बसवलेला नाही. शासनाकडून कलर प्रिंटर पुरविण्यात आला आहे. तरीही अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे हा कलर प्रिंटर अद्याप सुरु करण्यात आलेला नाही. यामुळे दस्त नोंदणी करणाऱ्या सर्व नागरिकांचे फोटो काळे (ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाईट) येत आहेत. एवढेच नव्हे तर, शासकीय कार्यालयात प्रिंट काढण्यासाठी लागणारा लीगल कागदही संबंधित नागरिकांना बाहेरून विकत आणायला लावला जातो. कार्यालयात पिण्याच्या पाण्याचीही कोणतीही सोय नाही. नागरिकांना सुविधा देण्याची प्राथमिक जबाबदारी अधिकाऱ्यांची असताना येथे उलटाच कारभार सुरू असल्याचा संताप वकिलांनी व्यक्त केला.

### अधिकारी निरुत्तर, बोलण्यास नकार

गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेल्या या दुरवस्थेबाबत वकिलांनी प्रभारी दुय्यम निबंधक राहुल उगलमुगले यांना घेराव घालून जाब विचारला. वकिलांच्या कायदेशीर आणि रोखठोक प्रश्नांवर प्रभारी निबंधक पूर्णपणे निरुत्तर झाले होते. या संपूर्ण प्रकरणाबाबत दैनिक नवा मराठाच्या प्रतिनिधीने प्रभारी दुय्यम निबंधक राहुल उगलमुगले यांच्याशी संपर्क साधून त्यांची बाजू जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी या विषयावर बोलण्यास नकार दिला. 'सोमवारी या, तुम्हाला प्रतिक्रिया देतो', असे सांगत त्यांनी अधिक बोलणे टाळले.

### वरिष्ठांकडे तक्रार करणार

दरम्यान या कार्यालयातील अनागोंदीबाबत जिल्हाधिकारी, मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करणार असल्याचा इशारा वकिलांनी दिला. तसेच आलेला निधी कोणत्या कारणासाठी खर्च झाला, त्यातून काय काय सुविधा लोकांसाठी निर्माण केल्या, याचीही चौकशी व्हावी, अशी मागणी करणार असल्याचे वकिलांनी सांगितले.


बाळांच्या वजन, उंची, भूक व प्रतिकारशक्ती वाढण्यासाठी आजच भेट द्या.
सन-२०१० पासून
चिरायु
लहान मुलांचे क्लिनिक
(जन्मापासून ते १८ वर्षापर्यंत)
प्रसिध्द बालरोग तज्ञांचा सल्ला
शाखा १ - सबजेल चौक, तुळजाभवानी मंदिरासमोर (डायमंड बेकरी समोर) अहिल्यानगर
9527931384 / 8830400170

# 'नीट'नंतर आता 'टीईटी' परीक्षेचा पेपरही फुटला, २८ जूनची रोजी होणारी परीक्षा रद्द

मुंबई - राज्यातील शिक्षक पात्रता परीक्षा पुन्हा एकदा पेपरफुटीच्या वादात अडकली आहे. २८ जून रोजी होणाऱ्या टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका आधीच बाहेर आल्याचा प्रकार ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथे उघडकीस आला आहे. पोलिसांनी २७ जून रोजी पहाटे छापेमारी करत काही संशयितांना ताब्यात घेतले आहे. या पार्श्वभूमीवर उद्या होणारी परीक्षा स्थगित करण्यात आल्याचे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने जाहीर केले आहे. देशभरात नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणानंतर आता आणखी एका महत्त्वाच्या स्पर्धा परीक्षेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

भिवंडी येथे टीईटीच्या प्रश्नपत्रिकांची विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांच्या खबऱ्यांनी दिली होती. परीक्षेचा पेपर पैशांच्या मोबदल्यात विकला जात असल्याचे समोर आल्यानंतर पोलिसांनी सापळा रचला. या कारवाईत फुटलेली प्रश्नपत्रिका जप्त करण्यात आली असून काही जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. याबाबतची माहिती तातडीने शिक्षण विभागाला देण्यात आली. त्यानंतर परीक्षा प्रक्रियेची विश्वासार्हता धोक्यात आल्याने संपूर्ण परीक्षाच रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### राज्यातील ४.२८ लाख विद्यार्थ्यांना फटका

यंदाच्या महाटीईटी परीक्षेसाठी राज्यभरातून ४ लाख २८ हजार १२२ उमेदवारांनी नोंदणी केली होती. यामध्ये पुणे जिल्ह्यातील सर्वाधिक ४५ हजार ५६२ उमेदवारांचा समावेश आहे. परीक्षा रद्द झाल्याने अनेक महिन्यांपासून तयारी करणाऱ्या लाखो उमेदवारांच्या मेहनतीवर पाणी फिरले असून, शिक्षकांमध्ये आणि पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

३२ वर्षाची यशस्वी शैक्षणिक परंपरा असलेले सुसज्ज कॉलेज
Bombay Institute of Vocational Training (Diploma & Technical College)
बॉम्बे हॉस्पिटल / बेकर्स समोर, वन विभाग कार्यालय मागे, नवीन महानगर पालिका जवळ, नगर - छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर. मो.8830685732
प्रवेश सुचना शासकीय नोकरीची पात्रता व इ्मी. महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त कोर्स
कालावधी : एक वर्ष पात्रता : १० वी, १२ वी, पदवीधर (पास/नापास) मुला/मुलींसाठी माध्यम-मराठी/इंग्रजी
बांधकाम पर्यवेक्षक कोर्स ( स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक ) (Civil Engineer Assist.)
मोठा इंजिनिअर व्हायचं आहे ना? मग काय करायचंय.... मी इंजिनिअर सारखा कसा होणार? कमी खर्चामध्ये व कमी कालावधीमध्ये...हे कोर्स केल्यानंतर जिल्हा परिषद (Z.P.) महानगरपालिका, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभाग (P.W.D.), लघु पाटबंधारे, रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, म्हाडा, आर्मी, नेव्ही, एअरफोर्स, रेल्वे व इतर बांधकाम विभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर शासकीय नोकरीची संधी, जिल्हा परिषद/म.पा./सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शासकीय ठेकेदाराचे (Govt. Civil Contractor) Licence काढता येते रजिस्ट्रेशन करू शकतो, जिल्हा परिषद मधील कनिष्ठ अभियंत्याचे सहायक या पदावर नामनिर्देशनाने अथवा बदलीने नियुक्ती करण्यासाठी बांधकाम पर्यवेक्षक हा अभ्यासक्रम समकक्ष आहे. सन २००८ ते २०२५ पर्यंत वरील व इतर शासकीय विभागात हा अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर (स्केल ९३००-३४,८०० ग्रेड पे ५६००) भरती प्रक्रिया झाली आहे. खासगी नोकरी/स्वत:चा व्यवसाय करता येतो. वयाची अट नाही...त्वरा करा... मर्यादित जागा...
उपरोक्त सर्व पदांसाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे नोकरीची संधी

कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
रत्नकमल™ चहा
10 किलो मागे 1 मोठी पिशवी फ्री..फ्री..
ब्रँडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा एक वेळेस जरुर तुलना करुन पहा
आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367
इतर कंपन्या पेक्षा 50 ते 70 रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम.

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे. आकर्षक पगार
भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

डीटीपी ऑपरेटर पाहिजे
कोरल-ड्रॉ, पेजमेकर, फोटोशॉप, इनडिझाईनच्या कामाचा अनुभव असलेले कॉम्प्युटरसाठी डिटीपी ऑपरेटर पाहिजे
भेटा - वेळ सायं.५ ते ८
दैनिक नवा मराठा कार्यालय
कै. आचार्य गुंदेचा चौक, गंज बाजार, अ.नगर
9823115157

हार्दिक अभिनंदन

ध्येय गाठले...
CA चे स्वप्न साकार झाले!
CA सिद्धांत बोगावत
हार्दिक अभिनंदन!!
शुभाशीर्वाद
स्व. बेबीबाई-स्व.पोपटलालजी बोगावत
शुभेच्छुक :
सौ. अरुणा-श्री गणेशमलजी डागा
सौ. नूतन - श्री.संदीप बोगावत
CA सौ. सृष्टी-प्रितीश बोगावत
सौ. रचना-सौरभजी पितळे
श्री. रौनक-राजेशजी कोठारी
श्री. विजयजी बोगावत
फर्म
पोपटलाल बोगावत अ‍ॅण्ड सन्स, जामखेड-करमाळा, मो : 9423461122
प्रितीश संदीप बोगावत Product Manager
rexroth A Bosch Germany

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# स्वच्छता अधिभाराच्या मोबदल्यात राज्यभरातील ‘सर्व स्वच्छतागृहे प्रवाशांना मोफत उपलब्ध करा’

नगर – महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने काढलेल्या परिपत्रकानुसार महामंडळाच्या बस स्थानक परिसरातील सार्वजनिक शौचालये व स्नानगृहे प्रवाशांना मोफत उपलब्ध करून द्यावी अशी मागणी करणारे पत्र ग्राहक पंचायत, महाराष्ट्रच्या अहिल्यानगर शाखेतर्फे शिष्टमंडळातर्फे अहिल्यानगर जिल्ह्याच्या विभागीय कार्यालयाला देण्यात आले. विभागीय कार्यालयाचे डिव्हीजनल कंट्रोलर यांच्या वतीने डीटीओ कमलेश भारती यांनी हे पत्र स्वीकारले व पुढील कार्यवाहीची ग्वाही दिली.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने एका परिपत्रकाद्वारे १ जून २०२६ पासून राज्यातील महामार्गावरून धावणाऱ्या सर्व बसेस मधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या तिकिटामध्ये २ रुपये स्वच्छता अधिभार लागू केला आहे या स्वच्छता अधिभाराच्या मोबदल्यात महामंडळाच्या बसस्थानक परिसरातील स्वच्छता गृहे प्रवाशांना वापरता येणार आहेत असेही महामंडळाने जाहीर केलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे.

मात्र या परिपत्रकाची अंमलबजावणी विविध बस स्थानकांमध्ये होत नसल्याचे ग्राहक पंचायतीच्या जिल्हाभरातील पदाधिकारी व सदस्यांना आढळले त्यानुसार स्थानिक पदाधिकाऱ्यांनी श्री. भारती यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. तसेच यापूर्वीचे स्वच्छता ठेकेदार यांनी अद्यापही ही स्वच्छतागृहे आपल्या अधिपत्याखाली ठेवली असून ते अनाधिकृतपणे प्रवाशांकडून स्वच्छतागृह वसणार गृह वापराबद्दल शुल्क आकारक आहेत तसेच यासंदर्भात एसटी महामंडळाच्या अधिकारांकडे तक्रार केली असता ते त्याची दखल घेत नसल्याचेही शिष्टमंडळाने त्यांना सांगितले याबाबत तत्काळ कारवाई व्हावी अशी मागणी दिलेल्या पत्राद्वारे त्यांनी केली.

### अहिल्यानगर ग्राहक पंचायतीची निवेदनाद्वारे मागणी



महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने काढलेल्या परिपत्रकानुसार महामंडळाच्या मालकीच्या स्वच्छतागृहे स्नानगृहे प्रवाशांना मोफत उपलब्ध व्हावीत अशा मागणीचे निवेदन ग्राहक पंचायत महाराष्ट्र अहिल्यानगर शाखेचे जिल्हा सचिव ॲड. सिद्धार्थ वाघमारे, सहसचिव संजय जोशी, सदस्य अजित कटारिया यांच्या शिष्टमंडळाने कमलेश भारती यांना दिले. (छाया – उदय जोशी)

प्रवाशांना अद्यापही या बदलाची जाणीव नसल्याने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने राज्यभरातील सर्व बसस्थानकांवर या आशयाचे फलक दर्शनी भागात ठळक अक्षरात लावावे तसेच बस स्थानकावरील ध्वनिक्षेपकावरून झालेला हा बदल अर्थात बस स्थानक परिसरातील शौचालय व स्नानगृह प्रवाशांसाठी मोफत आहेत व त्यासाठी प्रवाशांनी कोणतेही शुल्क देऊ नये अशी सूचना दर पंधरा–वीस मिनिटांनी प्रसारित करावी अशी ही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.

या निवेदनावर ग्राहक परिषदेचे अशासकीय सदस्य व ग्राहक पंचायती महाराष्ट्रच्या अहिल्यानगर शाखेचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर, जिल्हा संघटक डॉ. प्रा. राजेंद्र कळमकर, जिल्हा सचिव ॲड. सिद्धार्थ वाघमारे, सहसचिव संजय जोशी, सदस्य अजित कटारिया यांच्यासह आहेत. या निवेदनासाठी ग्राहक पंचायत महाराष्ट्र नाशिक विभागीय पदाधिकारी दत्तात्रेय शेळके व अहिल्यानगरचे जिल्हा कोष प्रमुख कृष्णराव बागडे यांचे सहकार्य लाभले.

## निराशावाद म्हणजे इक्विटीविरोध नाही; ते जोखीम व्यवस्थापन आहे



राजन कुटे

गुंतवणुकीबाबत बोलताना आशावादाला नेहमीच चांगली प्रतिमा मिळते. अर्थव्यवस्था वाढत आहे, उद्योग वाढत आहेत, कंपन्या प्रगती करत आहेत आणि काळाच्या ओघात बाजारांनीही संपत्ती निर्माण केली आहे. त्यामुळे आशावादी असणे स्वाभाविक आहे.

पण याचा अर्थ असा होत नाही की प्रत्येक वेळी सर्व काही आपल्या अपेक्षेप्रमाणेच घडेल.

अनेकदा गुंतवणुकीत निराशावादी दृष्टिकोनाला चुकीच्या अर्थाने पाहिलं जातं. एखादी व्यक्ती जोखमींबद्दल बोलू लागली, संभाव्य अडचणींचा विचार करू लागली किंवा सर्व पैसा एका ठिकाणी केंद्रित करण्याऐवजी सावध भूमिका घेतली, की तिला बाजार विरोधी समजलं जातं.

प्रत्यक्षात मात्र निराशावाद आणि इक्विटीविरोध यांचा संबंध नसतो.

एक अनुभवी चालक वाहन चालवताना अपघात होईल असं गृहीत धरून प्रवास करत नाही. पण तरीही तो सीटबेल्ट लावतो, वाहनाची नियमित देखभाल करतो आणि रस्त्यावर लक्ष ठेवतो. कारण सावधगिरी म्हणजे भीती नव्हे; ती तयारी असते.

गुंतवणुकीतही हेच लागू होतं.

जोखीम व्यवस्थापन म्हणजे बाजार कोसळणार आहे असा अंदाज बांधणं नव्हे. तर काही काळ गोष्टी आपल्या अपेक्षेप्रमाणे घडल्या नाहीत तरी आपली आर्थिक योजना टिकून राहील याची खात्री करणं होय.

म्हणूनच सुज्ञ गुंतवणूकदार केवळ परताव्याचा विचार करत नाहीत. ते जोखीमही समजून घेण्याचा प्रयत्न करतात. एखादी गुंतवणूक चांगली कामगिरी करत असेल, तरी त्यामध्ये किती चढउतार संभवतात, एखादा प्रतिकूल काळ किती काळ टिकू शकतो आणि अशा परिस्थितीत आपण मानसिकदृष्ट्या किती तयार आहोत, याचाही विचार ते करतात.

अर्थात, याचा अर्थ सतत भीतीत राहणं असा नाही. प्रत्येक घसरणीची वाट पाहणं किंवा प्रत्येक बातमीमुळे अस्वस्थ होणे हेही तितकंच चुकीचं आहे. खरं तर आशावाद आणि सावधगिरी हे एकमेकांचे विरोधक नाहीत. ते एकमेकांना पूरक असतात. आशावाद आपल्याला गुंतवणूक सुरू करायला मदत करतो. सावधगिरी आपल्याला ती टिकवून ठेवायला मदत करते.

दीर्घ काळात संपत्ती निर्माण करणारे अनेक गुंतवणूकदार आशावादी असतात. पण त्यांचा आशावाद आंधळा नसतो. ते चांगल्या काळाची अपेक्षा ठेवतात, पण कठीण काळाची शक्यता नाकारत नाहीत. खरं महत्त्वाचं काय, तर जोखीम व्यवस्थापनाचा उद्देश परतावा कमी करणं नसतो. त्याचा उद्देश असा असतो की परिस्थिती बदलली तरी आपण आपल्या योजनेपासून दूर जाऊ नये. कारण गुंतवणुकीत यश केवळ चांगल्या काळात टिकून राहण्यात नसतं; ते कठीण काळातूनही मार्ग काढण्यात असतं.

स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

– **राजन कुटे**, अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

# किरकोळ कारणावरुन मुकूंदनगरजवळ टोळक्याकडून २ जणांना बेदम मारहाण

नगर – नगर ते छत्रपती संभाजीनगर रोडवरील टॉपअप पेट्रोल पंपाजवळ किरकोळ वाहन अपघाताच्या कारणावरून दोघांना लाथाबुक्क्यांनी व लोखंडी गजाने बेदम मारहाण करून जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. तसेच त्यांच्या दुचाकीवर दगड घालून दुचाकीचे नुकसान केल्याची घटना २५ जून रोजी सायंकाळी ५.५० वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात मुकुंदनगरच्या ६ ते ७ जणांच्या टोळक्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या संदर्भात किरण सुरेश कराळे (वय ३०, रा. कापूरवाडी, ता. नगर) यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी संशयित आरोपी शेख आफशान इरफान, अली फिरोज खान, साहिल जावेद शेख (सर्व रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) आणि त्यांच्या इतर तीन ते चार साथीदारांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ जून रोजी सायंकाळी ५.५० वाजेच्या सुमारास फिर्यादी किरण कराळे हे त्यांचे मित्र रवी बीडे यांच्यासह मोटारसायकलवरून जात होते. टॉपअप पेट्रोल पंपाजवळ आरोपी शेख आफशान इरफान याने त्याच्या ताब्यातील बर्गमन मोपेड (क्र. एमएच १६ डी एक्स ५५६८) भरधाव वेगाने चालवून फिर्यादीच्या मोटारसायकलला जोराची धडक दिली. या अपघातात किरण कराळे आणि रवी बीडे हे दोघेही खाली पडले आणि त्यांना किरकोळ दुखापत झाली, तसेच त्यांच्या मोटारसायकलचेही नुकसान झाले.

अपघात झाल्यानंतर आरोपी शेख आफशान आणि अली फिरोज खान यांनी फिर्यादी व त्यांच्या मित्रासोबत वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद इतका वाढला की आरोपींनी त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. त्याच वेळी तिथे आरोपींचे इतर तीन ते चार साथीदार धावून आले आणि त्यांनीही फिर्यादीला मारहाण केली. या गर्दीतील एका इसमाने हातातील लोखंडी गजाने फिर्यादी किरण कराळे यांच्या डाव्या पायावर जोरात प्रहार करून त्यांना गंभीर दुखापत केली व जिवे ठार मारण्याची धमकी दिली. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी फिर्यादीच्या मोटारसायकलवर दगड मारून तिचे मोठे नुकसान केले व परिसरात शिवीगाळ करत दहशत निर्माण केली. मारहाणीत जखमी किरण कराळे व त्यांच्या मित्राला रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

२६ जून रोजी पहाटे कराळे यांनी दिलेल्या जबाबावरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ११५ (२), ३५१ (२) (३), ३२४ (४), १८९ (२), १९०, १९१ (२), २८९, १२५ (ए) (बी) आणि मोटार वाहन कायदा कलम १३४ (ए) (बी), १८४, १७७ प्रमाणे दंगलीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मालकी हक्क सिद्ध न करू शकल्याने पोलिसांकडून दुचाकीस्वाराला अटक

नगर – एम.आय.डी.सी. परिसरातील भळगट कॅन्टीनजवळ संशयास्पद रित्या विना कागदपत्र दुचाकी बाळगणाऱ्या एका इसमावर एमआयडीसी पोलिसांनी कारवाई केली आहे. ताब्यात घेतलेल्या दुचाकीच्या मालकी हक्काबाबत समाधानकारक उत्तर न देऊ शकल्याने पोलिसांनी मोटारसायकल जप्त करत संबंधितावर गुन्हा दाखल केला आहे. किशोर जयसिंग पटारे (वय ४५, रा. पिंपळगाव माळवी, ता. नगर) असे आरोपीचे नाव आहे.

एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पथक २५ जून रोजी रात्री ९.४५ वाजेच्या सुमारास एम.आय.डी.सी. परिसरात गस्त घालत असताना भळगट कॅन्टीनजवळ आरोपी किशोर पटारे हा त्याच्या ताब्यातील होंडा कंपनीची ’युनिकॉर्न’ मोटारसायकल (क्र. एमएच १२ जेएल ८७०६) घेऊन थांबलेला मिळून आला. पोलिसांनी त्याला थांबवून सदर मोटारसायकलच्या मालकी हक्काबाबत अधिकृत कागदपत्रांची विचारपूस केली. मात्र, त्याला आपल्या ताब्यातील वाहनाबाबत कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण किंवा कागदपत्रे सादर करता आली नाहीत.

संशयित आरोपीजवळ असलेली दुचाकी ही चोरीची किंवा संशयास्पद असल्याच्या कारणावरून पोलिसांनी ती जप्त केली आहे. याप्रकरणी पो. ना. दिपक फुंदे यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात आरोपी किशोर पटारे याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर दुचाकी कोणाची आहे आणि ती कुठून आणली, याचा शोध पोलीस घेत आहेत.

## विषारी औषध प्राशन केल्याने एकाचा उपचारादरम्यान मृत्यू

नगर – एका ५२ वर्षीय प्रौढाने अज्ञात कारणातून काहीतरी विषारी औषध प्राशन केल्याने त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना पारनेर तालुक्यातील रायतळे येथे घडली आहे. साहेबराव बबन मेमाणे (वय ५२, रा. रायतळे, ता. पारनेर) असे मयताचे नाव आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, २५ जून रोजी रात्री ११.०० वाजेच्या सुमारास साहेबराव मेमाणे यांनी कोणत्यातरी कारणाने विषारी औषध प्राशन केले होते. हा प्रकार लक्षात येताच त्यांना तातडीने उपचारासाठी सुपा येथील निरामय हॉस्पिटल येथे हलवण्यात आले व तिथल्या अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले.मात्र, डॉक्टरांचे शर्थीचे प्रयत्न सुरू असतानाच, दुसऱ्या दिवशी म्हणजेच २६ जून रोजी सकाळी ९.२६ वाजता डॉक्टरांनी साहेबराव मेमाणे यांना मृत घोषित केले.

या घटनेबाबत मृत साहेबराव यांचे पुतणे राहुल राजाराम मेमाणे (वय २९, रा. रायतळे) यांनी सुपा पोलीस ठाण्यात खबर दिली. त्यांच्या खबरीवरून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. साहेबराव यांनी नेमक्या कोणत्या कारणातून हे पाऊल उचलले, याचा शोध पोलीस घेत आहेत.

# महापंचायत ॲप प्रकरणाची त्रिस्तरीय चौकशी करा; अन्यथा आझाद मैदानावर बेमुदत उपोषण आंदोलन

### नियमांचे उल्लंघन; समृद्ध पंचायत राज अभियानाच्या अंमलबजावणीत अनियमितता?



नगर – अहिल्यानगर जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेल्या पारनेर, श्रीगोंदा आणि अहिल्यानगर पंचायत समित्यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन केल्याचा आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीने केला आहे. या प्रकरणाची त्रिस्तरीय समितीमार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी केली असून यासंदर्भातील निवेदन ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद प्रशासनाला सादर करण्यात आले आहे.

समितीच्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या विविध डिजिटल प्रणाली उपलब्ध असतानाही संबंधित पंचायत समित्यांनी तंत्रज्ञानाचा वापर करताना आवश्यक सुरक्षा निकषांचे पालन केले नाही. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रामपंचायतींचे कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान आणि पेपरलेस करण्याचा उद्देश असताना, त्याऐवजी ‘महापंचायत ॲप’ या खाजगी सॉफ्टवेअरचा वापर करण्यात आला. या प्रक्रियेत नागरिकांची अत्यंत संवेदनशील माहिती खाजगी सर्व्हरवर अपलोड करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

नागरिकांची आधारसदृश ओळखपत्रे, पॅनकार्ड, बँक खात्यांचे तपशील, घरगुती मालमत्तेची माहिती तसेच इतर वैयक्तिक कागदपत्रे कोणत्याही सुरक्षा हमीशिवाय खाजगी सर्व्हरवर साठविण्यात आली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अशा प्रकारे संवेदनशील माहितीचे व्यवस्थापन करणे हे नागरिकांच्या गोपनीयतेसाठी आणि डिजिटल सुरक्षेसाठी धोकादायक ठरू शकते, असा समितीचा दावा आहे.


याशिवाय, शासनाची अधिकृत प्रणाली उपलब्ध असतानाही ग्रामपंचायतींच्या स्वनिधीतून लाखो रुपयांचा खर्च करून महापंचायत ॲपची खरेदी कोणाच्या आदेशाने करण्यात आली, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. शासनाच्या मंजुरीशिवाय किंवा सक्षम अधिकाऱ्यांच्या निर्देशांशिवाय अशा प्रकारच्या खाजगी सॉफ्टवेअरचा वापर करण्यात आला असल्यास त्यामागील जबाबदार अधिकाऱ्यांची भूमिका तपासली जावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

समितीने पुढे असा आरोप केला आहे की, कोणत्याही खाजगी सॉफ्टवेअरला शासकीय कामकाजासाठी वापरण्यापूर्वी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र किंवा अन्य अधिकृत शासकीय संस्थेमार्फत सुरक्षा तपासणी होणे आवश्यक असते. मात्र महापंचायत पच्या बाबतीत अशा प्रकारचे सुरक्षा ऑडिट झाले असल्याची कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे या ॲपला मान्यता देण्याची प्रक्रिया, त्यामागील निर्णयप्रक्रिया आणि संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी यांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच ग्रामपंचायतींच्या स्वनिधीचा वापर करून करण्यात आलेल्या खरेदी प्रक्रियेत आर्थिक अनियमितता किंवा निधीचा अपहार झाला आहे का, याचाही तपास करण्यात यावा, अशी मागणी समितीने केली आहे. सिक्युरिटी ऑडिट पूर्ण होईपर्यंत आणि चौकशीचा अहवाल प्राप्त होईपर्यंत महापंचायत ॲपचा वापर तात्काळ बंद करण्याचे आदेश शासनाने द्यावेत, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, या मागण्यांवर प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने मुंबई येथील आझाद मैदानावर बेमुदत उपोषण आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

## दामोधर कोरडे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील शेतकरी दामोधर तुकाराम कोरडे (वय ७२) यांचे २६ जून रोजी सायं. ७ वा. अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, दोन मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. बहिरु कोरडे यांचे ज्येष्ठ बंधू, राजेंद्र व अशोक कोरडे यांचे वडील होत.

## महेश पवार यांचे अल्प आजाराने निधन

नगर – विनायकनगर येथील रहिवासी महेश दत्तात्रय पवार (वय ५०) यांचे २७ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, आई, भाऊ, भावजय, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. ते बारामती विद्या प्रतिष्ठान येथे प्राध्यापक होते. दिपक पवार यांचे ते बंधू तर सचिन कार्ले यांचे दाजी होत.




## दिलीप ढगे यांचे हृदयविकाराने निधन

नगर – खडकी येथील रहिवासी दिलीप अर्जुन ढगे (वय ६०, मूळ गाव चांभुर्डी, ता. श्रीगोंदा) यांचे २७ जून रोजी हृदयविकाराने निधन झाले झाले. त्यांच्या पार्थिवावर खडकी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, आई, २ भाऊ, भावजय असा परिवार आहे. ते अक्षय आणि इंजिनियर आदेश ढगे यांचे वडील तर सुरेश आणि मनेश ढगे यांचे बंधू होत.



## हाजी रमजानी मामू यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर – श्रीरामपूर शहर काँग्रेसचे माजी अध्यक्ष, नगरपालिकेचे ३५ वर्षे नगरसेवक राहिलेले शेख रमजान करीम उर्फ हाजी रमजानी मामू (वय ९६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. रामनवमी यात्रा कमिटीचे विश्वस्त म्हणून देखील त्यांनी अनेक वर्षे काम पाहिले.



पालिकेचे दीर्घकाळ नगरसेवक पद भूषविल्यानंतर त्यांच्या पत्नी नूरबी शेख यांना शहराचे नगराध्यक्ष पद भूषविण्याची संधी देखील मिळाली होती. सध्या त्यांची सून जायदाबी कुरेशी या गेल्या दोन टर्म पासून नगरसेविका आहेत.

त्यांच्या मागे कलीम व निवृत्त मुख्याध्यापक जलील, सलीम कुरेशी हे तीन मुले, नातवंडे, सुना असा परिवार आहे.

मोहरमच्या यौमे आशूराच्या पवित्र दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांचा दफनविधी येथील कब्रस्तानात झाला.

## लक्ष्मीबाई गायकवाड यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – सावतानगर, पंपींग स्टेशन भिंगार येथील रहिवासी लक्ष्मीबाई गायकवाड (वय ८३) यांचे २६ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात पती, २ मुली, जावई, नातवंडे, पणतू असा परिवार आहे. गोधुजी गायकवाड यांच्या त्या पत्नी होत.

## रामदास काकडे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – बोल्हेगाव अहिल्यानगर येथील रहिवासी रामदास नारायण काकडे (वय ५५) यांचे २६ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, ४ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. सोनाली, सिमा, उर्मिला, पल्लवी व अक्षय काकडे यांचे ते वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील लोककलावंतांचे मानधन वाढवून द्या

### दशरथ धुमाळ यांची आमदार संग्राम जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर – महाराष्ट्र राज्य विधानसभेचे अधिवेशन २२ जूनपासून सुरू होत असून, या आगामी अधिवेशनात अहिल्यानगर जिल्ह्यातील पारंपरिक लोककलावंतांच्या प्रलंबित मागण्या आणि त्यांच्या हक्कांचे प्रश्न तातडीने मांडण्यात यावेत, अशी मागणी हिंदवी रेणुकाई गोंधळी समाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष दशरथ धुमाळ यांनी केली आहे. या संदर्भात धुमाळ यांनी नुकतीच आमदार संग्राम जगताप यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन सुपूर्द केले व सकारात्मक चर्चा केली.



हिंदवी रेणुराई गोंधळी समाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष दशरथ धुमाळ यांनी आमदार संग्राम जगताप यांच्याबरोबर मागण्यांसंदर्भात निवेदन दिले.

आमदार जगताप यांना दिलेल्या निवेदनात अहिल्यानगर जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थितीवर विशेष प्रकाश टाकण्यात आला आहे. अहिल्यानगर हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने अत्यंत मोठा जिल्हा असून यामध्ये एकूण १४ तालुक्यांचा समावेश होतो. या विशाल कार्यक्षेत्राचा विचार करता जिल्ह्यातील पारंपरिक लोककलावंतांची शासकीय मानधनासाठीची निवड मर्यादा म्हणजेच इष्टांक वाढवून तो ५०० इतका करण्यात यावा, जेणेकरून जास्तीत जास्त गरजू कलावंतांना याचा लाभ मिळू शकेल. यासोबतच सध्या मिळणारे मानधन महागाईच्या काळात अत्यंत अपुरे असल्याने, लोककलावंतांच्या शासकीय मानधनात घसघशीत वाढ करून ते प्रतिमहिना दहा हजार रुपये करण्यात यावे, अशी मागणी धुमाळ यांनी या वेळी लावून धरली.

आपल्या निवेदनात लोककलावंतांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचे वास्तव मांडताना दशरथ धुमाळ म्हणाले की, लोककलावंत हे खऱ्या अर्थाने भारतीय संस्कृतीचे खंदे रक्षक आहेत. हे कलावंत पोटाची खळगी भरण्यासाठी आणि संस्कृती जिवंत ठेवण्यासाठी शहरे, गावे, वाड्या–वस्त्या, तांडे, डोंगर–दऱ्या अशा अत्यंत दुर्गम आणि आव्हानात्मक भागांमध्ये जाऊन आपली कला सादर करतात. पाऊस, ऊन किंवा कडाक्याची थंडी अशा कोणत्याही प्रतिकूल ऋतूची पर्वा न करता ते वर्षभर अविरत कष्ट उपसत असतात. एवढी मेहनत करूनही त्यांच्या हाती अत्यंत अल्प मानधन पडत असल्याने सध्या त्यांना शासकीय आर्थिक मदतीची आणि भक्कम पाठिंब्याची नितांत गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने या सर्व बाबींचा अत्यंत सहानुभूतीने व गांभीर्याने विचार करून लोककलावंतांचे मानधन वाढवावे, अशी मागणी त्यांनी केली असून आमदार संग्राम जगताप यांनीही या मागण्या अधिवेशनात मांडण्याचे आश्वासन दिले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### कोमट पाणी ठरेल 'अमृत'

कोमट पाणी हे दिसायला साधं, पण शरीरासाठी वरदान आहे. आयुर्वेदापासून ते आधुनिक विज्ञानापर्यंत सर्वांनीच सकाळी उठल्यावर कोमट पाणी पिण्याचे फायदे मानले आहेत. कोमट पाणी शरीरातील विषारी घटक बाहेर टाकते. याने पचनक्रिया सुधारते, बद्धकोष्ठतेचा त्रास कमी होतो आणि चयापचय क्रिया वाढते. वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी हे रामबाण आहे, कारण सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाणी प्यायल्याने चरबी जळण्याची प्रक्रिया वेगाने होते. घशातील खवखव, सर्दी, खोकला यावर कोमट पाणी तात्काळ आराम देते. रक्ताभिसरण सुधारल्याने त्वचा उजळते आणि चेहऱ्यावर तेज येते. सांधेदुखी आणि मासिक पाळीतील वेदना कमी करण्यासाठीही कोमट पाणी उपयुक्त ठरते. आयुर्वेदात कोमट पाण्याला 'अग्निवर्धक' मानले आहे. जेवणानंतर अर्ध्या तासाने कोमट पाणी प्यायल्याने अन्नपचन व्यवस्थित होते व गॅस, ॲसिडिटीचा त्रास होत नाही. आले-लिंबू टाकून प्यायल्यास त्याचा फायदा दुप्पट होतो. महागड्या डिटॉक्स ड्रिंक्सपेक्षा कोमट पाणी सहज, फुकट आणि प्रत्येक घरात उपलब्ध असणारे 'सुपरड्रिंक' आहे. दिवसातून २-३ वेळा कोमट पाणी पिण्याची सवय लावा. लक्षात ठेवा अति गरम पाणी पिऊ नये, ओठाला सोसवेल एवढंच कोमट असावं.

## पाककला

### इन्स्टंट ब्रेड रसमलाई

**साहित्य :** ब्रेड स्लाईस ६, फुल फॅट दूध ५०० मिली, साखर ५ चमचे, मिल्क पावडर ३ चमचे, वेलची पूड १/४ चमचा, केशर ८-१० काड्या, बारीक चिरलेले बदाम-पिस्ते २ चमचे, वाटल्यास गुलाबपाणी १/२ चमचा

**कृती :** जाड बुडाच्या भांड्यात दूध उकळायला ठेवा. उकळी आल्यावर गॅस मंद करा. त्यात साखर, मिल्क पावडर, वेलची पूड आणि केशर घाला. सतत ढवळत ५-६ मिनिटे आटवून घ्या. दूध जरा घट्ट झाले पाहिजे. गॅस बंद करून गुलाबपाणी घाला. तयार रबडी थंड करायला ठेवा. ब्रेडच्या स्लाईसच्या कडा कापून टाका. वाटीने किंवा ग्लासने गोल आकारात कापून घ्या. एका खोलगट डिशमध्ये ब्रेडचे काप ठेवा. त्यावर तयार केलेली थंड रबडी ओता. ब्रेड पूर्ण भिजला पाहिजे. वरून बदाम-पिस्त्याचे काप भुरभुरा. डिश ३० मिनिटे फ्रीजमध्ये ठेवा म्हणजे ब्रेड रबडी शोषून घेईल. थंडगार ब्रेड रसमलाई सर्व्ह करा.

## वास्तू

### देवघर

* देवघर नेहमी घराच्या ईशान्य कोपऱ्यात असावे. देवांचे तोंड पश्चिमेकडे आणि आपले तोंड पूर्वेकडे येईल असे देव ठेवा.

* देवघर बेडरूममध्ये किंवा जिन्याखाली अजिबात नको. त्यामुळे घरात अशांतता वाढते आणि प्रार्थना फळत नाही.

* तिजोरी किंवा कपाट ज्यात पैसे-दागिने ठेवता ते दक्षिण भिंतीला लागून ठेवा, पण तोंड उत्तरेकडे उघडेल असे ठेवा. उत्तर दिशा कुबेराची असते.

## सौंदर्य

२ स्टीलचे चमचे १० मिनिटे फ्रीजमध्ये ठेवा. थंड चमचे डोळ्यांवर २ मिनिटे दाबून धरा. डोळ्याखालची सूज, काळी वर्तुळे आणि थकवा लगेच कमी होतो.

## सल्ला

फोन पाण्यात पडल्यास फोन लगेच बंद करा. सिम कार्ड, मेमरी कार्ड काढा. फोन तांदळाच्या डब्यात ४८ तास पुरून ठेवा. तांदूळ फोनमधील सर्व ओलावा शोषून घेतो. हेअर ड्रायर वापरू नका, सर्किट जळते. ८०% वेळा फोन वाचतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

रविवार, दि. २८ जून २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ शुक्लपक्ष, ज्येष्ठा २५।०९, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** नव्या संधी दार ठोठावतील. आत्मविश्वास वाढेल. खर्चावर नियंत्रण ठेवा. प्रवासाचे योग.

**वृषभ :** कुटुंबासोबत वेळ घालवाल. जुन्या मित्राची भेट होईल. अडकलेले पैसे मिळण्याची शक्यता. आरोग्य जपा.

**मिथुन :** कामाच्या ठिकाणी कौतुक होईल. नवीन कल्पना सुचतील. बोलण्यावर संयम ठेवा, गैरसमज टळतील.

**कर्क :** घरात शुभकार्याची चर्चा होईल. मानसिक शांती मिळेल. गुंतवणूक करताना काळजी घ्या.

**सिंह :** नेतृत्वाची संधी मिळेल. रखडलेली कामे मार्गी लागतील. रागावर ताबा ठेवा. वाहन जपून चालवा.

**कन्या :** अभ्यास किंवा कौशल्य विकासासाठी उत्तम दिवस. नोकरीत बदलाचे संकेत. पोटाचे विकार त्रास देतील.

**तूळ :** जोडीदारासोबत मतभेद मिटतील. कलाक्षेत्रातील लोकांना प्रसिद्धी मिळेल. कायदेशीर कामे टाळा.

**वृश्चिक :** धाडसी निर्णय फायदेशीर ठरेल. स्पर्धेत यश मिळेल. थकवा जाणवेल, विश्रांती घ्या.


**धनु :** लांबच्या प्रवासाचे योग. धार्मिक कार्यात मन रमेल. कोणावरही आंधळा विश्वास नको. कागदपत्रे तपासून सही करा.

**मकर :** वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. उत्पन्नाचे नवे स्रोत मिळतील. घरातील ज्येष्ठांच्या तब्येतीकडे लक्ष द्या.

**कुंभ :** मित्रांकडून मदत मिळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. महत्त्वाचा निर्णय घाईत घेऊ नका.

**मीन :** सर्जनशील कामांना वाव मिळेल. मुलांकडून आनंदाची बातमी. भावनेच्या भरात खर्च करू नका.

## शब्दगंध क्र. ७४६१ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) हर्ष; अठ्ठेचाळीसावे संवत्सर ४) लाजणारा; लाजाळू ७) 'गीतरामायण'चे रचनाकार १०) एकसारखे एकीकडेच पाहणे; एकाग्र दृष्टी १२) शिंपडणे; शिंतोडा; ओसाडा १४) मध्य प्रदेशातील एक प्रमुख शहर १६) तळहात किंवा तळहात १७) कांब; गज १९) रेशन दुकानात मिळणारे एक खाद्यतेल २०) देऊळ; राऊळ; मंदिर २३) शंकर; महादेव; सदाशिव २४) तापट; रागीट

**उभे शब्द :-** १) भडकलेला अग्नी २) मुलगी; कन्या; कामधेनू ३) एक श्वासरोग ४) एक मराठी आडनाव ५) पाणी; नीर; जीवन ६) दणकट; कणखर; मजबूत ८) कोलकात्याचे आंतरराष्ट्रीय विमानतळ (पूर्वीचे नाव) ९) एकेक बाब घेऊन ११) पांढरे चकचकीत; संगमरवरी १२) शिवणावळ १३) दिवा लावण्यासाठी बनविलेली कापसाची सुरळी; वायू; वारा १५) तगमग; तडफड १८) मत्सर; द्वेष; आकस २०) फूल किंवा फळ ज्याला धरते तो वनस्पतीचा भाग २१) वेल; वल्लरी २२) मृत्यूचा देव

### शब्दगंध क्र. ७४६० चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** मौन हे असे उत्तर आहे, जिथे शब्द अपुरे पडतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### विमान इतकं जड असूनही हवेत कसं उडतं?

एकविसाव्या शतकात विमान प्रवास सामान्य झाला आहे. शिक्षण, व्यवसाय, पर्यटन यासाठी विमान अत्यावश्यक बनले आहे. मात्र अनेकदा आपल्याला प्रश्न पडतो की ५०० टन वजनाचं विमान हवेत तरंगतं कसं? ते खाली का पडत नाही? ही किमया फक्त एका कारणामुळे घडत नाही, तर विज्ञानाचे अनेक नियम एकत्र आल्याने विमान उडते. सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे विमानाच्या पंखांचा आकार. पंख वरून फुगीर आणि खालून सपाट असतात. याला 'एअरोफॉईल' म्हणतात. विमान जेव्हा धावपट्टीवर वेगाने पळते तेव्हा हवा पंखावरून आणि पंखाखालून जाते. वरची हवा जास्त अंतर कापते म्हणून तिचा वेग वाढतो आणि दाब कमी होतो. खालची हवा संथ वाहते म्हणून दाब जास्त राहतो. हा दाबातला फरक विमानाला वर उचलतो. यालाच 'लिफ्ट' म्हणतात.

दुसरे कारण म्हणजे इंजिनची ताकद. जेट इंजिन प्रचंड वेगाने हवा मागे फेकते. न्यूटनच्या तिसऱ्या नियमानुसार प्रत्येक क्रियेला समान व विरुद्ध प्रतिक्रिया असते. त्यामुळे विमान प्रचंड वेगाने पुढे ढकलले जाते. वेग २५० किमी तासाच्या वर गेला की लिफ्ट तयार होते आणि विमान हवेत झेपावते. तिसरे कारण म्हणजे वेग. विमान जितक्या वेगाने धावेल तितकी जास्त लिफ्ट तयार होते. म्हणूनच विमानाला उडण्यासाठी ३ किमी लांबीची धावपट्टी लागते. हळू चालणारे विमान कधीच उडू शकत नाही. पक्षी पंख हलवून उडतात पण विमानाचे पंख स्थिर असतात. मग ते वर कसे राहते? कारण वेग आणि पंखांचा आकार हेच पंख हलवल्याचे काम करतात. हवेचा दाब पंखाखाली सतत जास्त ठेवला जातो. थोडक्यात, विमान उडणे ही फक्त इंजिनची कमाल नसून पंखांचा आकार, वेग, हवेचा दाब आणि विज्ञानाचे नियम या सर्व गोष्टींचा एकत्रित परिणाम आहे. यावर कायमचा उपाय म्हणून विमान उडताना खिडकीतून पंख बघा, तुम्हाला लहानसे फ्लॅप्स वर-खाली होताना दिसतील.

## खरा हिरा

राघव नावाचा एक शाळकरी मुलगा बाजारातून घरी येत होता. वाटेत त्याला एक चमकदार पाकीट सापडले. उघडून बघितले तर आत ५०० च्या नोटांचे बंडल होते. एकूण २० हजार रुपये होते. राघवचा जीव खाली-वर झाला. त्याच दिवशी त्याच्या बाबांना पगार मिळाला नव्हता. घरात धान्यही संपले होते, आई काळजीत होती. मनात विचार आला, एकदाच घेतले तर कुणाला कळणार? पण दुसऱ्याच क्षणी शाळेतल्या बाईंचे शब्द आठवले. मुलांनो, प्रामाणिकपणा हा माणसाचा खरा दागिना असतो. राघवने पाकीट खिशात ठेवले आणि सरळ पोलीस स्टेशन गाठले.

हवालदार काकांना सर्व हकीकत सांगून पाकीट जमा केले. काकांनी त्याची पाठ थोपटली, नाव-पत्ता लिहून घेतला. दोन दिवसांनी एक रडणारे गृहस्थ पोलीस स्टेशनवर आले. माझ्या मुलीच्या ऑपरेशनचे पैसे होते, कुठेतरी हरवले ते म्हणाले. हवालदारांनी खात्री करून त्यांना पाकीट परत दिले. त्या गृहस्थाने राघवला बोलावून घेतले आणि मिठी मारली.

बाळा, तू देवासारखा धावून आलास. हे २ हजार बक्षीस घे. राघव नम्रपणे म्हणाला, काका, चांगल्या कामाचे पैसे घेत नाहीत. गावात राघवच्या प्रामाणिकपणाची बातमी वाऱ्यासारखी पसरली. शाळेत मुख्याध्यापकांनी सर्वांसमोर त्याचा सत्कार केला. त्या गृहस्थाने राघवच्या बाबांना स्वतःच्या कंपनीत नोकरी दिली. म्हणाले, ज्याचा मुलगा इतका प्रामाणिक, त्याचा बापही खरा असेल. राघवच्या घरची गरिबी कायमची संपली. आईने डोळ्यात पाणी आणून राघवला जवळ घेतले.

बाळा, पैशापेक्षा तू कमावलेली इज्जत लाख मोलाची आहे. राघवच्या वर्गमित्रांनीही त्याच्यापासून प्रेरणा घेतली. त्या दिवसानंतर वर्गात कुणाची पेन्सिल सापडली तरी मुले शिक्षकांना देत. राघवला कळले की एका चांगल्या कृतीने अख्खं गाव बदलू शकतं. कारण प्रामाणिकपणा हा संसर्गजन्य असतो, पण चांगल्या अर्थाने. म्हणूनच लोक आजही म्हणतात, राघवसारखं वागा, खरा हिरा बना.

तात्पर्य : एक प्रामाणिक कृती फक्त तुमचं नाही तर अनेकांचं आयुष्य बदलू शकते. प्रामाणिकपणाचं फळ उशिरा मिळेल, पण ते कायम टिकणारं असतं.

## आत्मशक्ति



### न्याय निवाडा

प्रत्येक दोन जीवनकाळातील मधल्या काळात, आमचा आत्मा आपल्या कर्माच्या न्यायनिवाड्यानुसार स्वर्गात किंवा नरकात रहातो.नंतर हा आत्मा पुन्हा नवे जीवन घेऊन येतो, असे हे चक्र चालूच राहते. मोक्षाच्या माध्यमातून त्याची जन्ममृत्युच्या ह्या रहाटगाडग्या सारख्या अनंत चक्रातून सुटका (मुक्ती) होऊ शकते. आध्यात्मिक ध्यानधारणादि साधनाद्वारे त्याचा आत्मा परमेश्वरांशी जोडला जातो.

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### त्यांचा संघर्ष

शिवानीदीदी : तुम्हाला फक्त तुमच्या विचारांबरोबर खेळायचं होतं. आपण आयुष्यात कितीतरी अवघड गोष्टी करतो. आपले स्वतःचेच विचार आपल्याला विसंगत सल्ले देऊन आपल्या मनात अनेकदा संघर्ष निर्माण करतात. आपल्याला फक्त त्यांच्याशी खेळायचं आहे आणि गुंता सोडवायचा आहे. हे आपण फक्त शांत बसून करू शकतो. असं करणं किती अवघड असू शकतं?

सुरेश ओबेरॉय : हे माझ्यासाठी खूपच अवघड होतं. कारण मी आतापर्यंत अनेक चित्रपटांत काम केलं आहे, अनेक पुरस्कार मिळवले आहेत. जर एखादी व्यक्ती मला म्हणाली की मी तुम्हाला ओळखत नाही तर हे मला पटणार नाही. शिवानीदीदी : यात कोण दुखावलं गेलं?

सुरेश ओबेरॉय : मी अस्वस्थ झालो. मी दुखावलो.

शिवानीदीदी : ह्यातला 'मी' कोण आहे? इथे तो मी म्हणजे आत्मा नाहीये. तुम्ही दुखावलात कारण आयुष्यात अनेक गोष्टी मिळवूनही तुम्ही दुर्लक्षिले गेलात.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

डॉक्टर : तुमचं वजन खूप वाढलंय. रोज ५ किमी चालत जा.
पेशंट : चालेल डॉक्टर.
१ आठवड्यानंतर पेशंटचा फोन...
पेशंट : डॉक्टर, मी आता घरापासून ३५ किमी लांब आहे, परत कसं येऊ?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगाचे छप्पर म्हणून कोणाला ओळखले जाते?

– पामीर पठार, मध्य आशिया

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'बाप-लेक'

रक्तनात्यातलं अत्यंत जिव्हाळ्याचं, ममत्वाचं असणारं नातं अर्थात बाप – लेक. जगातला प्रत्येक बाप आपल्या मुला, मुलीसाठी प्रतिकुल परिस्थितीशी संघर्ष करत असतो, धडपडत असतो, अथक परिश्रम करत असतो. मला जे-जे मिळालं नाही ते-ते सगळं, माझ्या मुलाला मिळु दे ह्यासाठी जीवाचं रान करत असतो. ज्याच्याजवळ आज बाप नाही त्याला पितृछत्र काय असतं ते विचारा. तो रडल्याशिवाय राहणार नाही. रिक्षावाल्याचा मुलगा कलेक्टर झाला, भाजीपाल विकणाऱ्याचा मुलगा डॉक्टर झाला... हे वाचलं की खरं तर आपल्याला सुध्दा मनापासून आनंद होतो. त्या मुलाचा संघर्ष आपल्या नजरेसमोर येऊ लागतो. मला त्या मुलाच्या आई, वडिलांचं विशेष कौतुक वाटतं. मुलाच्या, मुलीच्या प्रचंड मोठ्या ध्येयासाठी त्यांनी रक्ताचं पाणी केलेलं असतं, अहोरात्र परिश्रम केलेले असतात. आता एसटी स्टॅण्डवर हमाल दिसत नाहीत. ही घटना त्यावेळेसची आहे जेव्हा एस टी स्टॅण्डमध्ये हमाल (कुली) असायचे. एका साहेबांसोबत मी बाहेरगावी चाललो होतो.

आम्ही बसस्थानकात आलो. हमालाने साहेबांची बॅग उचलली. वर ठेवली. साहेबाने पैसे दिले. तो हमाल साहेबांकडे डोळे भरुन पाहु लागला. साहेबाला म्हणाला, 'सायब, माह्या मुलगाबी तुमच्यासांर्का सायब व्हणार. मप्ल्याला लईच आनंद व्हईन तवा.' साहेब म्हणाला, 'नक्की होईल साहेब तुझा मुलगा. ह्यासाठी माझ्याकडुन काय लागलं तर जरुर सांग.' साहेबांनी व्हिजीटिंग कार्ड त्या हमालाला दिलं. हमाल गेल्यावर साहेब म्हणाले, 'ह्या बिचाऱ्याची इच्छा खरंच पूर्ण व्हावी. आपल्यालाही आनंद होईल.' त्या दिवशी मला एकाच ठिकाणी दोन बाप पाहायला मिळाले. एक बाप रक्तनात्याचा आणि दुसरा बाप रक्तनात्याशिवायचा. एक बाप, दुसऱ्या बापाच्या इच्छेचा छान आदर करतो हेसुध्दा माझ्या लक्षात आलं. काळाच्या ओघातही रक्तनातं कधीच बदलत नसतं. पण परवा बातमी वाचली तेव्हा अंतर्मुख झालो. 'संपत्तीसाठी मुलाने बापाचा खुन केला.' बापसुध्दा आपली संपत्ती आहे हे त्या मुलाला का कळालं नाही ? जन्मदात्या बापापेक्षा संपत्ती एवढी महत्वाची का वाटली?

बाप – मुलाच्या नात्यातलं ममत्व, संपत्तीपुढं का फिकं पडलं ? उन्हात राबणारा, आपली काळजी घेणारा, आपल्यावर सुसंस्कार करणारा बाप त्याला का दिसला नाही ? आपलंच रक्त आपला काळ होतं ह्याच्याइतकं भयंकर दुःख, घटना ह्या जगात कोणतीच नसेल. बापाचा जीव घेणारा मुलगा दुर्दैवी म्हणावा लागले. त्या बापाच्या वेदना आपल्याला होतील का ? नाही होणार. कारण आपलं त्या दोघांसोबत रक्तनातं नाही. आई, बापापेक्षा मोठी संपत्ती ह्या जगात नाहीय हे त्या मुलाला का समजलं नसेल ? मुलगा एवढा क्रूर का वागु शकतो ? त्या संपत्तीच्या मोहावर मुलाला, मात का करता आली नाही? स्वार्थासाठी माणूस कितीतरी खालच्या थराला जातो. त्याचवेळी दुसरी एक बातमी समजली होती एक तरुण मुलगा मोटारसायकल चालवत होता. रस्त्यामधल्या खड्डा वाचवतांना तो मुलगा त्याच खड्ड्यात पडला. मृत्यू पावला. अचानकपणे तरुण मुलाचं प्रेत पाहणाऱ्या बापाच्या वेदना आपल्याला होतील का ? तरुण मुलाचं प्रेत बापाच्या खांद्यावरुन जाणं ह्यासारखं वाईट काहीच नसेल. मुलाच्या दशक्रिया विधीनंतर त्या बापाने त्या गावातील सगळे खड्डे स्वतः काम करुन भरले. दुसरा एखादा रडत, खड्डे पडल्याबद्दल दोष देत संबंधित व्यक्तीला अपशब्द वापरुन गप्पा बसला असता. पण ह्या बापाने ठरवलं असणार माझा तरुण मुलगा खड्ड्यामुळं रस्त्यावरच्या अपघातात मृत्यू पावला पण दुसऱ्या कुणा बापाचा तरुण मुलाचं असं होऊ नये म्हणून खड्डे बुजवणारा बाप नजरेसमोर उभा राहतो. तरुण मुलांनीही नाईट कल्चरच्या नादी न लागता व्यसनांच्या आहारी न जाता आपल्या बापाची दैनंदिनी पाहिली पाहिजे, अनुभवली पाहिजे. पैसा, संपत्ती भविष्यात आपल्या जवळ असेलंच असं नाही पण बापासाठी जगलंच पाहिजे, बापाला म्हातारपणी जपलं, सांभाळलंच पाहिजे. बापाच्या आदर्श आचार, विचारांच्या अंगिकार करुन स्वतःची प्रगती केलीच पाहिजे. बापाचा व्यवसाय असेल तर शक्य होईल तेवढी व्यवसायात मदत मुला, बापानं, सांगितलेलं काम, कृती मनापासून केलीच पाहिजे. मुलींनीसुध्दा आई, वडिलांचं ऐकलंच पाहिजे ह्यातच मुला, मुलीचं भलं होणार असतं. आपल्याला घडवणारा, वाढवणारा, जपणारा, सांभाळणारा बाप आपण काळजी घेऊन जपलाच पाहिजे, 'त्याच्या म्हणारपणात त्याची काठी झालंच पाहिजे. ज्यांना आई, वडिल नाहीत त्यांचा कधीतरी विचार केल्याचं आठवतंय का? नसेलच केला विचार. अशांचा जरुर विचार कराच. तरच आपल्या आई, वडिलांचं असणं, आपल्यासाठी अमूल्य आहे हे लक्षात येईल. तुम्ही बाप व्हाल तेव्हा, तुमच्या मुला, मुलींसाठी वेळ द्या. मुलं, मुली हिच आपली संपत्ती असते.

(लेख क्र.६०७)

**– सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### पुदीना

४) भूक मंद झाली असेल व पोटात गुबारा धरला असेल, तर अशा वेळी पुदिना, तुळस, आले, जिरे, मिरे, आवळा यांचा काढा करून तो प्यावा. यामुळे पचनशक्ती सुधारून भूक चांगली लागते व आतड्यांची हालचाल वाढून पोटातील गॅस कमी होतो.

५) सर्दी-खोकला व ताप यांचा त्रास जाणवत असेल, तर त्या वेळी पुदिना, तुळस व आले यांच्यापासून बनविलेला काढा कपभर प्यावा. या काढ्याने ताप त्वरित कमी होऊन आराम मिळतो. तसेच सर्दीमुळे नाक चोंदले असेल, तर अशा वेळी दोन थेंब पुदिन्याचा रस नाकामध्ये टाकल्यास सर्दीपासून आराम मिळतो.

६) पुदिन्यामध्ये अ, क व ई जीवनसत्त्व भरपूर असल्यामुळे एकूणच पुदिन्याचा वापर करावा.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची जयंती आणि सामाजिक न्याय दिन विविध समाजोपयोगी उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

# जयंतीनिमित्त केडगावात राजषी शाहू महाराजांच्या विचारांचा जागर; ११० गरजू विद्यार्थिनींना गणवेश आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप

नगर – राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळ संचलित केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची जयंती आणि सामाजिक न्याय दिन विविध समाजोपयोगी उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. सामाजिक समता, शिक्षण, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या उपक्रमांमुळे संपूर्ण परिसर शाहू विचारांनी दुमदुमून गेला.

यावेळी विद्यालयाच्या वतीने केडगाव ते शाहूनगर परिसरात जनजागृती मिरवणूक काढण्यात आली. विद्यार्थिनींनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज, मावळे आदींची वेशभूषा परिधान करून आकर्षक जिवंत देखावे सादर केले. राजर्षी शाहू महाराजांचा विजय असो, सामाजिक न्याय दिनाचा विजय असो, झाडे लावा, झाडे जगवा, प्लास्टिकचा वापर टाळा, मुले–मुली एकसमान, दोघांनाही शिकवा छान तसेच स्वच्छता पाळा, रोगराई टाळा अशा विविध सामाजिक संदेशांचे फलक हातात घेऊन विद्यार्थिनींनी परिसरात जनजागृती केली.

सामाजिक बांधिलकी जपत विद्यालयाच्या वतीने ११० गरजू विद्यार्थिनींना शालेय गणवेश, बूट व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. याच कार्यक्रमात विद्यालयाच्या प्राचार्या वासंती धुमाळ यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रमेश बजाबा गवळी होते. प्रमुख पाहुणे म्हणून कायझेन अकॅडमीचे संचालक, व्याख्याते व समुपदेशक महेश डाळिम्बकर उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना महेश डाळिम्बकर म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक परिवर्तनाचे कार्य आणि विचार भावी पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांचे मोठे महत्त्व आहे. शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नसून योग्य निर्णयक्षमता, सामाजिक जबाबदारी आणि मानवी मूल्यांची जाणीव करून देणारी प्रक्रिया आहे. डिजिटल युगात ऑनलाइन शिक्षणाच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत; मात्र त्याचा सुजाण व मर्यादित वापर होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी ज्ञानाबरोबरच संस्कार, सामाजिक भान आणि मानवी मूल्येही आत्मसात करण्याचे त्यांनी आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात रमेश गवळी म्हणाले, दूरदृष्टी, सामाजिक समता आणि शिक्षणाचा प्रसार करणारे लोककल्याणकारी राजे म्हणजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज. समाजातील वंचित घटकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत त्यांनी सामाजिक परिवर्तनाची भक्कम पायाभरणी केली. त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन करून त्यांचे विचार समाजात रुजविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरणार असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नामदेव वायळ यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय संजयकुमार निक्रड यांनी करून दिला. राजश्री पालवे यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनकार्याचा प्रेरणादायी परिचय उपस्थितांना करून दिला. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष भास्कर जासूद, सचिव बबन कोतकर ,सहसचिव रावसाहेब सातपुते, खजिनदार प्रल्हाद साठे, कार्यकारी संचालक जयद्रथ खाकाळ, संचालक दगडू साळवे, जयश्री कोतकर, नगरसेविका वर्षा काकडे, माजी शिक्षक राजेश सोनवणे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रेणुका म्हस्के, प्राचार्या वासंती धुमाळ देणगीदार, पालक तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन जालिंदर सातपुते व छाया सुंबे यांनी केले. सूत्रसंचालन समृद्धी लटके व छाया सुंबे यांनी केले. प्राचार्या वासंती धुमाळ यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## मना सत्यसंकल्प जीवी धरावा

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स




मी सत्यवादी हरिश्चंद्र राजाची कथा ऐकतो. खूप प्रभावित होतो. सत्य बोलेन सत्याशिवाय इतर काहीही बोलणार नाही, अशी शपथ घेतो. प्रसन्नता अनुभवतो. स्वतःला साधुसंतांच्या पंगतीत नेऊन बसवतो. आता मी जमिनीवर नसतो. खोटे बोलणाऱ्यांना लाख शिव्या मोजतो. पण दुसऱ्या दिवशी कामाला लागताच कथा विसरतो. खोट्याचे खरे करुन हरिश्चंद्राचा नवा अवतार घेतो; पण ऋग्वेदाच्या ऋषीने सांगितलेला सोमदेवतेचा प्रभाव कुठे लक्षात घेतो? सोम ही यज्ञाशी संबंद्ध अशी निसर्गातील शक्तिशाली देवता आहे.

जगात खोटं बोलण्याची स्पर्धा लागलीय. खरं तर सत्य केव्हाच मागं पडलंय. खऱ्याचा मार्ग काटेरी झुडपांनी व्यापलाय. खोट्याची पायवाट मात्र वर्दळीमुळे राजवाट झाली आहे. सत्याचा मार्ग सरळ आहे. पण म्हणूनच कंटाळवाणा आहे. खोट्याचा वळणदार वेडावाकडा मार्ग मात्र करमणूक करणारा आहे. त्या मार्गावरुन अदृश्य शक्ती खऱ्याला देत रक्षण आणि खोट्याला मात्र मरण।

मना, तुझा जाउ देऊ नकोस तोल. जे खरं असेल तेच बोल. अरे, खोट्याला काहीही नाही मोल. तुझ्या डोळ्यांना पट्टी खोल. खोट्याची साथ करणं फोल. वाईट गोष्टी करणं टाळ, चांगल्या गोष्टी करण्याचे निर्णय पाळ. खोट्याला नष्ट करील तो काळ.

अरे, खरे बोलायला कुठे कष्ट पडतात ? काय त्यासाठी पैसे मोजावे लागतात? अरे खोट्याचेच पाप टाळायला तन, मन आणि धन खर्ची पडतात. मन चिंतेत तन चितेत आणि धन खर्चेत. मग का रे बोलता खोटे? जे तुम्हाला दुःखात लोटे. खऱ्याचे मात्र सुख मनी दाटे. त्या सुखाची न तुलना कोठे. पण खरे बोलायला धैर्य हवं. संस्कारानं ते प्राप्त व्हावं. मग जग सुधारावं. सर्वत्र सुख नांदावं, यापरते दुसरं काय मागावं ?

एक होता राजा, त्याचा गलथान कारभार. प्रजा त्याच्यावर नाराज फार मग त्यानं केली युक्ती. म्हणाला मी प्रजेला अमर करणार. अमृत शोधणार, पण प्रजा कसची बधते. मग त्यानं केली घोषणा. अमृताचा शोध लावला. अमृत तयार झाले. त्याच्या प्रधानानं त्याला अनुमोदन दिले. तेही सांगू लागले, की राजानं प्रजेला अमर करायला अमृत तयार केलं, तरीही प्रजा खूश होईना. ती म्हणाली, की देवदत्त नावाच्या प्रधानावर आमचा विश्वास. तो सत्यच बोलणार खास. मग राजानं देवदत्ताला बोलावलं. त्याच्यापुढे अमृत – ठेवलं आणि त्याला दरडावून सांगितलं की, हे अमृत आहे असं सांग.

देवदत्तानं ते सांगायचे नाकारले. मी खोटं बोलणार नाही असं बजावले. अमृत कुणीच तयार करू शकत नाही, हेच सत्य आहे. म्हणून तुम्ही भरलेल्या या प्याल्यात अमृत नाहीच. राजा रागावला. म्हणाला, हा प्याला प्राशन कर आणि हे अमृत आहे म्हणून सांग. नाहीतर मी तुला ठार करीन. देवदत्त हसला. राजानं त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. खोटं बोलून प्रजेचं रक्षण करणारा राजा सगळ्यांचाच नाश करतो. हे अमृत नाही. तुम्ही सत्य वागत नाही. राजा आता संतप्त झाला, हो मग मरायला तयार म्हणाला.

देवदत्त पुन्हा हसला व म्हणाला, मी हे अमृत पितो. पण राजा, हे खरंच अमृत असेल, तर तू मला ठार करू शकणार नाहीस आणि पिऊन देखील मी मेलो तर प्रजा समजेल ते अमृत नाही. तुझं खोटेपण प्रजेच्या ध्यानात येईल. प्रजा तुझा आणखी तिरस्कार करेल. खोटारडा म्हणून निंदा करेल.

राजा ते ऐकून भानावर आला. देवदत्ताच्या सत्य बोलण्यापुढे नमला। यापुढे प्रजेला नीट सांभाळून म्हणाला.

**– किशोर गांधी**

# सतलोक आश्रम ढवळपुरी, पारनेर येथे २८ जूनला रक्तदान शिबिराचे आयोजन

नगर – पारनेर तालुक्यातील सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत रामपाल महाराज यांच्या पावन सानिध्यात परमेश्वर कबीर साहेब यांच्या ६२९ प्रकट दिनानिमित्त मुनिंदर धर्मार्थ ट्रस्ट सतलोक आश्रम यांच्या वतीने विशाल भंडारा, संत गरीबदास महाराज यांच्या अमरवाणीचे अखंड पाठाचे आयोजन करण्यात आले आहे.

संत रामपाल महाराज यांचा मुख्य उद्देश समाजातील जातीपातीचा भेद दूर करणे, तरुणांची व्यसनमुक्ती करणे, हुंडा मुक्त विवाह करणे, समाजात बंधुभाव व शांतता प्रस्थापित करणे.समाजातील हुंडा सारख्या कुप्रथा बंद करणे हा आहे.

या सोबतच हुंडा मुक्त विवाह व रक्तदान शिबिराचे आयोजन २८ जून रोजी सकाळी आठ ते सायंकाळी पाच या वेळेमध्ये रक्तदान शिबिर होणार आहे. या रक्तदानाच्या महान कार्यात सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन सतलोक आश्रम ढवळपुरी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# लहुजी वस्ताद साळवे यांच्या पुतळ्यासाठी केडगाव येथे २८ जूनला बैठक

## सकल मातंग समाजाचा पुढाकार



नगर – शहरातील ऐतिहासिक अप्पू हत्ती चौकात उभारलेल्या अश्वावर आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याची मागणी सकल मातंग समाजाच्या वतीने करण्यात आलेली आहे. या पार्श्वभूमीवर सकल मातंग समाज केडगावच्या वतीने शिवाजी मंगल कार्यालय अंबिकानगर येथे मातंग समाजाच्या बैठकिचे २८ जून रोजी सायंकाळी ५ वाजता आयोजन करण्यात आले आहे.

केडगाव सकल मातंग समाजाचे समन्वयक प्रा. विशाल पाचारणे यांनी मातंग समाजबांधवांनी मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. सदर मेळाव्यास प्रभाग क्र. १५,१६,१७ च्या नगरसेवकांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याचे अध्यक्ष संतोष साळवे यांनी सांगितले.

ॲड. प्रदीप सकट, राजू बोरगे, महेश लोखंडे, विष्णू लोखंडे, साठे, संतोष उमाप, राजू डाडर, अक्षय बोरगे, गोरख लोखंडे आदी पदाधिकारी या बैठकीचे नियोजन व व्यवस्थापन पाहत आहे.

समाजातील लोकांनी अधिक माहितीसाठी ८२०८९५४९२५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करण्याचे प्रसिद्धी प्रमुख धनंजय पाचारणे यांनी म्हटले आहे.

# डॉ. एन.जे. पाऊलबुद्धे फार्मसी महाविद्यालयातर्फे ३० जून रोजी 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत जनजागृती रॅलीचे आयोजन

## जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया उपस्थित राहणार



डॉ.पाऊलबुधे फार्मसी कॉलेजतर्फे नशामुक्त भारत अभियान रॅलीचे आयोजन करण्यात आले. त्याचे निमंत्रण जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांना देण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ.श्याम पंगा, प्राचार्य अनुराधा चव्हाण, डॉ.रोशनी सूर्यवंशी, स्वाती कडनोर आदी. (छाया – विजय मते)

नगर – वसंत टेकडी येथील डॉ.एन.जे. पाऊलबुद्धे फार्मसी महाविद्यालयातर्फे 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत समाजामध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने ३० जूनला सकाळी ७ ते ९ या वेळेत जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले असून या रॅलीमध्ये जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया उपस्थित राहणार आहेत. ही रॅली श्रीराम चौक ते डी–मार्ट या मार्गावर आयोजित करण्यात येणार असून, राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच समाजकल्याण विभाग, अहिल्यानगर जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने हा जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहे.

या रॅलीचे उद्देश स्पष्ट करताना प्राचार्य डॉ. श्याम पंगा यांनी सांगितले की, सध्याच्या काळात युवकांमध्ये वाढत असलेल्या अमली पदार्थांच्या सेवनामुळे निर्माण होणारे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दुष्परिणाम अत्यंत चिंताजनक आहेत. या पार्श्वभूमीवर युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण करून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याच्या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. नशा सोडा – जीवन जोडा हा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख हेतू आहे असे ते म्हणाले.

या उपक्रमासाठी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले असून, त्यांनी या सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले असून या रॅलीसाठी आपण आवर्जून उपस्थित राहणार असल्याचे सांगितले. या उपक्रमात पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, समाजकल्याण अधिकारी देविदास कोकाटे तसेच राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जिल्हा समन्वयक गणेश निमसे आदी उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी प्राचार्य डॉ.श्याम पंगा, प्राचार्य अनुराधा चव्हाण, डॉ. वेणु कोला, डॉ. विजय तारडे, डॉ. रोशनी सूर्यवंशी, स्वाती कडूनोर उपस्थित होते. या उपक्रमात सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सर्व शैक्षणिक शाखांतील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी या जनजागृती रॅलीमध्ये सहभाग नोंदविणार असून, व्यसनमुक्त भारताचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी सहभागी होणार आहेत.

महाविद्यालयातर्फे विद्यार्थी, युवक, नागरिक, स्वयंसेवी संस्था तसेच सामाजिक संघटनांनी या जनजागृती रॅलीमध्ये सहभागी होऊन व्यसनमुक्त, सुदृढ आणि निरोगी समाजाच्या निर्मितीस हातभार लावावा, असे आवाहन महाविद्यालयातर्फे करण्यात आले आहे.

# ज्ञानरचना सोशल फाउंडेशनकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप

## आर्थिक अडचणी शिक्षणाच्या आड येऊ देणार नाही : सुप्रिया मावळे चौधरी यांचे आश्वासन



ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या वतीने पारनेर तालुक्यातील लोणी मावळा येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी आवश्यक शैक्षणिक किटचे वितरण करण्यात आले.

नगर – शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत अधिकार असून आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण खंडित होऊ नये, या सामाजिक बांधिलकीतून कार्यरत असलेल्या ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या वतीने पारनेर तालुक्यातील लोणी मावळा येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी आवश्यक शैक्षणिक किटचे वितरण करण्यात आले. या उपक्रमांतर्गत तीस विद्यार्थ्यांना वह्या, दप्तर, कंपास बॉक्स तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य देण्यात आले.

कार्यक्रमात ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या संचालिका सौ.सुप्रिया मावळे चौधरी व सारिका मावळे यांच्या मातोश्री सुनंदा गौतम मावळे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी संस्थेच्या संचालिका सौ. सुप्रिया मावळे चौधरी, संचालक प्रविण साळवे, भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नानाभाऊ मावळे, सचिव नवनाथ शेंडकर, ज्येष्ठ पत्रकार सुरेश खोसे पाटील , मुख्याध्यापक मच्छिंद्र राऊत, विकास शेंडकर, बाबासाहेब दौंड, संतोष झरेकर, बाबाजी मावळे, बाळासाहेब मापारी, हरिभाऊ जाधव, रघुनाथ पवार, सौ. गुंड, अमृता लोंढे, आदिनाथ वाघ, विजय लाळगे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रास्ताविकात संस्थेचे संचालक प्रविण साळवे यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की, ज्ञानरचना सोशल फाउंडेशनची स्थापना २०२३ मध्ये करण्यात आली असून सौ. सुप्रिया मावळे चौधरी, सारिका मावळे आणि प्रविण साळवे यांच्या पुढाकारातून भारत सरकारकडे सेक्शन–८ कंपनी म्हणून संस्थेची नोंदणी करण्यात आली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक उन्नती हे ध्येय समोर ठेवून संस्था विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम सातत्याने राबवत आहे.

संस्थेच्या माध्यमातून एज्युकेशनल मटेरियल बँक, सामाजिक संस्थांसाठी क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यशाळा, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी सर्पदंश व त्यावरील उपाययोजना विषयक जनजागृती कार्यक्रम, ग्रामीण महिलांसाठी शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र, तसेच सामाजिक, व्यावसायिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा राज्य व राष्ट्रीय स्तरावर गौरव सोहळा अशा अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी बोलताना सुप्रिया चौधरी यांनी सांगितले की, शिक्षण हीच खरी समाज परिवर्तनाची ताकद आहे, यावर आमचा दृढ विश्वास आहे. प्रत्येक मुलामध्ये अमर्याद क्षमता असते; मात्र अनेक वेळा आर्थिक अडचणीमुळे त्या क्षमतेला योग्य दिशा मिळत नाही. अशा विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा छोटासा प्रयत्न म्हणून ज्ञानरचना सोशल फाउंडेशन हा उपक्रम राबवत असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे संचालिका सुप्रिया मावळे चौधरी म्हणाल्या की, ज्ञानरचना सोशल फाउंडेशन महाराष्ट्र आणि गोवा या दोन राज्यांमध्ये शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि व्यावसायिक कौशल्य विकास या क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे. संस्थेच्या वतीने सुरू असलेली एज्युकेशन मटेरियल बँक गेल्या चार वर्षांपासून शैक्षणिक साहित्य वितरणाचा उपक्रम राबवत आहे. या उपक्रमाचा प्रमुख उद्देश म्हणजे ज्ञानाचा प्रवाह प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचविणे आणि संसाधनांच्या अभावामुळे एकाही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू न देणे हा आहे.

संस्थेने उभारलेल्या शैक्षणिक साहित्य बँकेच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल, दुर्गम आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य सहज उपलब्ध करून दिले जात आहे. यासोबतच शैक्षणिक संसाधनांचा पुनर्वापर, डिजिटल अध्ययन साहित्याचे केंद्रीकरण, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि स्वयंअध्ययनाला प्रोत्साहन देण्याचे कार्यही संस्था सातत्याने करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



आरक्षणातील उपवर्गीकरणास जाहीर समर्थन देण्यासाठी नगरमध्ये विशेष सह्यांची मोहीम गौरवशाली मातंग इतिहास संवर्धन संघटन व मातंग एकता आंदोलन यांच्यावतीने राबवण्यात आली. यावेळी चंद्रकांत काळोखे, राम वडागळे, पोपट पाथरे आदी.

# आरक्षणातील उपवर्गीकरणाचे समर्थनार्थ सह्यांच्या मोहिमेस नागरिकांचा प्रतिसाद

नगर – छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती व सामाजिक न्याय दिनाचे औचित्य साधून आरक्षणातील उपवर्गीकरणास जाहीर समर्थन देण्यासाठी नगरमध्ये विशेष सह्यांची मोहीम राबवण्यात आली. अहिल्यानगर शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्या जवळ गौरवशाली मातंग इतिहास संवर्धन संघटन व मातंग एकता आंदोलन यांच्या वतीने राबवण्यात आलेल्या या सह्यांची मोहीमेस नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ फलकावर स्वक्षऱ्या केल्या.

महाराष्ट्र शासनाने त्वरित अनुसूचित जातीच्या आरक्षणातील उपवर्गीकरण अ.ब.क.ड. लागू करावे, मागासलेल्या व अविकसीत जाती घटकांना संविधानिक आरक्षणाचे हक्क व फायदे मिळण्यासाठी उपवर्गीकरणास संपूर्ण पाठिंबा व्यक्त करून समर्थनासाठी ही स्वाक्षरी मोहीम राबवण्यात आल्याची माहिती समाजाचे नेते चंद्रकांत काळोखे यांनी दिली.

चंद्रकांत काळोखे म्हणाले, आरक्षणाचे जनक राजश्री शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त आम्ही ही सह्यांची मोहीम हाती घेतली आहे. आज एकाच वेळी संपूर्ण राज्यात ही मोहीम सुरु असून १ ऑगस्ट पर्यंत चालणार आहे. या मोहिमेद्वारे भावी पिढीच्या उज्वल भवितव्यासाठी अनुसूचित जातीच्या आरक्षणातील उपवर्गीकरणास समर्थन देत ते त्वरित लागू करण्याची मागणी आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे करत आहोत.

राम वडागळे म्हणाले, राजश्री शाहूमहाराजांनी व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दीनदलितांना आरक्षण दिले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाप्रमाणे राज्य शासनाने त्वरित आरक्षणातील उपवर्गीय अ.ब.क.ड. त्वरित मान्य करून समजला न्याय द्यावा, अशी मागणी आम्ही करत आहोत.

यावेळी वैशाली खरे, मंगल गाडे, मंदाकिनी काळोखे या महिलांसह ज्येष्ठ नागरिक विठ्ठल उमाप यांनी सह्या करून या मोहिमेची सुरुवात केली. या मोहिमेत चंद्रकांत काळोखे, राम वडागळे, नाना साबळे, सागर खरे, सचिन भारस्कर, गुलाब गाडे, पांडुरंग घोरपडे, प्रा. राहुल जाधव, पोपट पाथरे, मोहन बुलाखे, चंद्रकांत खजिनदार, महादेव कोकाटे आदीसह समाजातील नागरिकांनी सहभाग नोंदवला.





अहिल्यानगर महानगरपालिका आणि रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात जनजागृतीपर सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. (छाया – लहू दळवी)

# अहिल्यानगर महानगरपालिका आणि रोटरी क्लबच्या वतीने राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेनिमित्त सायकल रॅली

### एकही बालक सुटू नये, हीच पोलिओ निर्मूलनाची गुरुकिल्ली : महापौर ज्योतीताई गाडे

नगर – राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महानगरपालिका आणि रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात जनजागृतीपर सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. पोलिओमुक्त भारताचे स्वप्न अधिक भक्कम करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने काढण्यात आलेल्या या रॅलीला प्रतिसाद मिळाला.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, पोलिओ हा लहान मुलांना कायमचे अपंगत्व आणू शकणारा गंभीर विषाणूजन्य आजार आहे. या आजारावर प्रभावी उपचार नसले तरी सुरक्षित आणि प्रभावी लसीकरणाद्वारे त्याचा संपूर्ण प्रतिबंध करता येतो. भारताने पोलिओमुक्त देशाचा मान मिळवला असला तरी जगभरातून पोलिओचे संपूर्ण उच्चाटन होईपर्यंत सतर्कता आणि नियमित लसीकरण सुरू ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, हीच पोलिओ निर्मूलनाची खरी गुरुकिल्ली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सायकल रॅलीचे उद्‌घाटन महापौर ज्योतीताई गाडे आणि उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महापालिका आयुक्त यशवंत डांगे, महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. साहिल शेख, डॉ. वृषाली आरु, डॉ. दिलीप बागल, डॉ. गिरीश दळवी, योगेश औटी, सुमित जाधव, रोटरी क्लबचे अध्यक्ष सुनील कटारिया, सायकल असोसिएशनचे चंद्रशेखर मुळे, डॉ. धनंजय कुलकर्णी, सचिन सातपुते, आशा सेविका, आरोग्य कर्मचारी तसेच सायकलस्वार उपस्थित होते.

उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले, प्रत्येक पालकाने आपल्या ० ते ५ वर्षे वयोगटातील मुलांना नियमित लसीकरणाबरोबरच पल्स पोलिओ मोहिमेतील प्रत्येक डोस देणे गरजेचे आहे. माझे मूल निरोगी आहे, त्यामुळे लसीची गरज नाही किंवा वारंवार लस दिल्याने अपाय होतो अशा गैरसमजांना कोणताही वैज्ञानिक आधार नाही. प्रत्येक बालकाचे आरोग्य सुदृढ आणि सुरक्षित राहावे यासाठी २८ जूनला पालकांनी आपल्या जवळच्या पोलिओ बूथवर जाऊन मुलांना पोलिओ लसीचे दोन थेंब अवश्य पाजावेत, असे आवाहन त्यांनी केले.

महापालिका आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने पोलिओ जनजागृती आणि लसीकरण प्रोत्साहनासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. आज आयोजित करण्यात आलेल्या सायकल रॅलीच्या माध्यमातून शहरभर पल्स पोलिओ मोहिमेचा प्रभावी संदेश देण्यात आला आहे. लसीकरणाबाबतचे गैरसमज दूर करून प्रत्येक पात्र बालकापर्यंत 'पोलिओचे दोन थेंब – आयुष्याचे' हा संदेश पोहोचविणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. ते पुढे म्हणाले की, प्रत्येक बालकाला पोलिओ लसीचा लाभ मिळणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. विशेषतः स्थलांतरित कामगारांची मुले, झोपडपट्टी परिसरातील बालके आणि दुर्गम भागातील मुलांपर्यंत लसीकरण पोहोचविण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. प्रत्येक डोस मुलांचे संरक्षण अधिक बळकट करतो, असे त्यांनी नमूद केले.

आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांनी राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेची सविस्तर माहिती देत नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

जनजागृती रॅलीचे विशेष आकर्षण म्हणजे उपमहापौर धनंजय जाधव यांनी स्वतः सायकल चालवत रॅलीमध्ये सहभाग घेतला. त्यांनी पल्स पोलिओ लसीकरणाबाबत जनजागृती करत प्रत्येक पालकापर्यंत पोलिओमुक्त भारताचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न केला. रॅलीदरम्यान एकही बालक सुटू नये या घोषवाक्याने परिसर दुमदुमून गेला आणि पोलिओ निर्मूलनाबाबत जनजागृतीचा प्रभावी संदेश नागरिकांपर्यंत पोहोचला.

## स्वप्न आपणा सर्वांचे – पोलिओमुक्त जगाचे

रोटरी इंटरनॅशनल ही संस्था गेल्या अनेक दशकांपासून ग्लोबल पोलिओ निर्मूलन उपक्रमात एक महत्वपूर्ण भागीदार राहिली आहे आणि रोटरीने पोलिओचे रूग्ण ९९.९% ने कमी करण्यामध्ये मोठी भूमिका बजावली आहे. रोटरीने १२२ देशांमध्ये २.५ अब्जांहून अधिक मुलांचे पोलिओ निर्मुलनासाठी लसीकरण करण्यास मदत केली आहे. रोटरी इंटरनॅशनलने पोलिओ लसीचा पुरवठा, निधी संकलन, स्वयंसेवकांचे प्रशिक्षण, मुलांचे लसीकरण, जनजागृती, लोकशिक्षण तसेच विविध मोहिम व लोकशिक्षणाद्वारे पोलिओच्या विषाणू विरूध्द अत्यंत मोठा लढा यशस्वी केला आहे. अशा आंतरराष्ट्रीय रोटरी संस्थेचे सभासद म्हणून आम्हाला खुप अभिमान वाटतो आहे.

भारत सरकार व रोटरी इंटरनॅशनलच्या सामुहिक प्रयत्नांतून २७ मार्च २०१४ रोजी भारत पोलिओमुक्त झाला. त्याची अधिकृत घोषणा जागतिक आरोग्य संघटनेने केली. ही आंनदाची बाब आहे. परंतु आपले शेजारी देश अफगाणिस्तान आणि पाकिस्तान मध्ये २०२३ साली काही पोलिओचे रूग्ण आढळले त्यासाठी आपण भारतीयांनाही विशेष दक्षता पाळण्याची आवश्यकता आहे. २४ ऑक्टोबर १९८८ हा जागतिक पोलिओ दिवस म्हणून का साजरा केला जातो. वैद्यकीय संशोधक डॉ. जोनास साल्क यांनी पोलिओचे उच्चाटन करण्यासाठी प्रभावी पोलिओ लसीचा शोध लावला व त्यांच्या जन्मदिवस जागतिक पोलिओ दिवस म्हणून साजरा केला जातो. **काही प्रश्न उत्तरे –**

**१) पल्स पोलिओ लसीकरण योजना काय असते?** सगळया भारतात एकाच दिवशी ५ वर्षांखालील प्रत्येक बालकांना लसीकरण केलं जातं त्याला पल्स पोलिओ लसीकरण योजना म्हणतात.

**२) यंदाच्या वर्षी पोलिओ लसीकरणाचे दिवसं कोणते?** २८ जून रोजी पोलिओ लसीकरण होणार आहे.

**३) बाळ आजारी असलं तरी पोलिओचे डोस द्यायचे का?** हो, पोलिओचे हे डोस म्हणजे बाळासाठी दोन थेंब अमृताचे आहेत. प्रत्येक बाळाला डोस देणे आवश्यक आहे. बाळ आजारी असलं तरी, बाळाला ताप आला तरी, बाळानी आधी कधीही म्हणजे, अगदी आदल्या दिवशी लसीकरण केलं असेल तरीही पोलिओ प्रतिबंधक डोस पाजणे अत्यंत आवश्यक आहे.

**४) हा पोलिओ होतो तरी कशामुळे?** हा रोग पोलिओच्या विषाणूंमुळे होतो. हा रोग अस्वच्छतेमुळे, घाणीमुळे, दुषित पाण्याच्या मलविसर्जनाच्या माध्यमातून पसरतो, हा रोग फक्त मानवातच होत असल्यामुळे पोलिओ या रोगाचे १००% निर्मूलन करता येऊ शकते. सोपा व रामबाण उपाय म्हणजे लसीकरण ही मोहिम सर्व ठिकाणी १००% यशस्वी झाली तर भारतच काय पूर्ण जग पोलिओ मुक्त होऊ शकतो. ५ वर्षांखालील बालकांना ह्या पोलिओ विषाणूंचा प्रादुर्भाव जास्त होत असल्यामुळे ५ वर्षापर्यंतच्या सर्व बालकांचं लसीकरण करणं अत्यंत महत्वाचं आहे.

**स्वप्न आपणा सर्वांचे पोलिओमुक्त भारताचे :** भारताचे जाणकार नागरिक म्हणून सर्वांनी सगळया राष्ट्रीय योजना राबविण्यास मदत केली तर आपला हा भारत देश सुजलाम्, सुफलाम्, समृध्द व पोलिओ मुक्त ही होईल. तर मंडळी आपली लेकरं ही आपली राष्ट्रीय संपत्ती आहेत, आपल्या देशाचे भावी नागरिक आहेत. आपल्या सर्वांचे भविष्य आहेत. आपली ही राष्ट्रीय संपत्ती अधिक निरोगी, आरोग्यदायी करण्यासाठी आपणा सर्वांचे भविष्य अधिक उज्वल करण्यासाठी इतर सर्व राष्ट्रीय योजनां बरोबरच पल्स पोलिओ लसीकरण योजना योजना यशस्वी करूयात. फक्त आपल्या देशातच नव्हे तर शेजारी देशातही पोलिओ लसीकरणाची ही मोहिम यशस्वी होण्यासाठी ही प्रयत्न करूयात.



**– डॉ. सुधा कांकरिया,**
माजी अध्यक्ष रोटरी क्लब ऑफ अ.नगर, मो. ९८५०८८७८३८

## अक्कलकोट श्री स्वामी समर्थ पालखी सोहळ्याचे अहिल्यानगर शहरामध्ये १ जुलै रोजी आगमन

नगर – श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ अक्कलकोट श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमा, महाराष्ट्र परिक्रमेचे २९ वे वर्ष आहे. सालाबाद प्रमाणे १ जुलै रोजी कल्याण रोड येथील समाधाननगर, आनंद पार्क, शांताई बंगला, ढोरे परिवार येथे श्री स्वामी समर्थ पालखी सोहळ्याचे आगमन सकाळी ११ वा. होणार आहे. ११:३० वाजता महाआरती स्वामी भक्तांच्या उपस्थितीत होणार आहे. महाआरतीनंतर भाविकांना महाप्रसादाचे (भंडारा) वाटप करण्यात येणार आहे. या धार्मिक सोहळ्यासाठी व श्री स्वामी समर्थ पालखी व पादुका मुक्कामी असल्याने स्वामी भक्तांना दर्शनासाठी दिवस भर व्यवस्था करण्यात आली आहे. भक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ढोरे परिवाराने केले आहे.



२ जुलै रोजी सकाळी ६:३० वाजता अभिषेक करण्यात येणार आहे. तसेच पालखीचे प्रस्थान सकाळी ९ वाजता होणार आहे, अशी माहिती शांती ऑडिओ चे राजु ढोरे यांनी दिली आहे.

## जि.प. कर्मचारी सोसायटीच्या तज्ञ संचालकपदी गोरक्ष शेळके व दत्तात्रय होलम

नगर – अहिल्यानगर जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीच्या तज्ञ संचालक (स्वीकृत) पदी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील आरोग्य सहाय्यक गोरक्ष रंगनाथ शेळके व कर्जत पंचायत समिती येथील वरिष्ठ सहाय्यक दत्तात्रय विनायक होलम यांची निवड करण्यात आली आहे.




सोसायटीच्या संचालक मंडळाची मासिक सभा नुकतीच संस्थेच्या कार्यालयात चेअरमन संजय कडूस यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेत चेअरमन कडूस यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार संस्थेत सभासदांमधून २ तज्ञ संचालक नियुक्त करण्याची तरतूद असून त्यानुसार नूतन तज्ञ संचालकाची नियुक्ती करावी, अशी सुचना मांडली त्यास उपस्थित सर्व संचालकांनी सहमती दर्शवित एकमताने गोरक्ष शेळके व दत्तात्रय होलम यांची निवड केली. सदरप्रसंगी संस्थेचे चेअरमन संजय कडूस, व्हा.चेअरमन अर्जुन मंडलिक, सर्व संचालक यांनी (स्वीकृत) तज्ञ संचालकांचे अभिनंदन केले.

सदर प्रसंगी संचालक प्रशांत मोरे, विक्रम ससे, विलास शेळके, अरुण जोर्वेकर, भाऊसाहेब चांदणे, इंजी. राजू दिघे, डॉ. दिलीप डांगे, चंदकांत संसारे, ऋषीकेश बनकर, स्वप्नील शिंदे, श्रीमती ज्योती पवार, कल्याण मुटकुळे, योगेंद्र पालवे, सुधीर खेडकर, श्रीकांत देशमाने, काशिनाथ नरोडे, कैलास डावरे, श्रीमती सुरेखा महारनुर, श्रीमती मनिषा साळवे, व्यवस्थापक राजेंद्र पवार, उपव्यवस्थापक प्रशांत लोखंडे, चेतन चव्हाण, अभिजित पवार, संतोष देशमुख व कर्मचारी वृंद आदी उपस्थित होते.

## हृदयरोगी रूग्णांना मिळाला दिलासा : हेल्दी हार्ट राजयोगा शिबीर उत्साहात

नगर – येथील आनंदऋषीजी मेडिटेशन सेंटरच्या सभागृहात खास हृदयरोगी रूग्णांसाठी हेल्दी हार्ट राजयोगा शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराचा लाभ घेतलेल्या रूग्णांनी समाधान व्यक्त करीत दिलासा मिळाल्याच्या भावना व्यक्त केल्या. या शिबीरात हृदयरोगी रूग्णांसहित नर्सिंग कॉलेजच्या जेष्ठ विद्यार्थीनींनीही लाभ घेतला अशी माहिती आनंदऋषीजी हॉस्पिटलचे व्यवस्थापक डॉ. आशिष भंडारी यांनी दिली.




येथील आनंदऋषीजी मेडिटेशन सेंटरच्या सभागृहात खास हृदयरोगी रूग्णांसाठी हेल्दी हार्ट राजयोगा शिबीराचे दीपप्रज्वलनाने उद्‌घाटन करताना डॉ. प्रकाश कांकरिया आदी.

तीन दिवसीय झालेल्या या शिबीराचे उद्‌घाटन डॉ. प्रकाश कांकरिया यांच्या हस्ते झाले. सदर प्रसंगी हृदयरोगतज्ज्ञ डॉ. राहुल अग्रवाल डॉ. अमित भराडीया, डॉ. अनिकेत कटारीय, राजयोगा मेडिटेशनच्या अभ्यासक डॉ. सुधा कांकरिया, ब्रह्माकुमारी राजराजेश्वरी दिदी, बी के प्रभा दिदी, रोटरीचे अध्यक्ष सुभाष गर्जे उपस्थित होते. सदर शिबीराचे आयोजन आनंदऋषीजी हॉस्पिटलचे प्रिव्हेंटिव्ह कार्डिओलॉजी डिपार्टमेंट, ब्रह्माकुमीजचे साईबन में मधुबन गीतापाठशाला व रोटरी क्लब ऑफ अ.नगर ने केले होते.

शिबीरात हृदयाची रचना, कार्य, हृदयाचे आजार व उपचार तसेच हार्ट अटॅक, एन्जीओप्लास्टी, बायपास याविषयी हृदयरोगतज्ज्ञ डॉ.अनिकेत कटारिया, डॉ. राहुल अग्रवाल, डॉ.अमित भराडिया यांनी मार्गदर्शन केले.

डॉक्टरांनी दिलेले उपचार मेडिसीन घेण्यासोबतच मेडिटेशन पण करणे हे महत्वाचे आहे हे अधोरेखित केले. तसेच हृदयरोग होण्याच्या कारणात ६०% पेक्षा जास्त भाग हा मानसिक प्रदुषण असुन खाण्यापिण्यातील अनियमितता, चुका, व्यायामाचा अभाव, तसेच अनिद्रा यांचाही सामावेश आहे.

मानसिक शांतता, प्रसन्नता लाभण्यासाठी तसेच मानसिक बळ लाभण्यासाठी आणि ताणतणावा पासुन दूर राहण्यासाठी राजयोगा मेडिटेशन जीवनपध्दती अंगिकारणे महत्वाचे आहे, असे प्रतिपादन राजयोगा मेडिटेशनच्या अभ्यासक डॉ. सुधा कांकरिया यांनी केले व राजयोगा मेडिटेशनची विधी व सिध्दी समजावुन सांगितली.

बी के राजराजेश्वरी यांनी राजयोगा व्दारे झालेले संशोधनाची माहिती दिली.

सदर प्रसंगी डॉ. सुधा कांकरिया लिखित 'हृदय आरोग्याच्या गप्पा गोष्टी' या पुस्तकाचे वितरण करण्यात आले.

डॉ. प्रकाश कांकरिया म्हणाले की सध्या भारत हा हृदयरोगाची राजधानी ठरत असुन तरूण वयातही आता हृदयरोग बळावत चालला आहे. त्याचा वेळीच बंदोबस्त करणे आवश्यक आहे. उच्च रक्तदाब, मधुमेह, लठ्ठपणा, मांसाहारी भोजन, वाढलेले कोलेसट्रॉल यामुळे हृदयरोगाची संख्या वाढत चालली आहे. याचे ही नियंत्रण करण्यासाठी राजयोगा जीवनपध्दती उपयोगी ठरते.

रोटरीचे अध्यक्ष सुभाष गर्जे यांनी आभार मानले.

या हेल्दी हार्ट राजयोगा शिबीराची पुढील बॅच जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवडयात होणार असुन त्यासाठी ९८५०८८७८३८ या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

सदर शिबीर मोफत असुन नांवनोंदणी मात्र आवश्यक आहे.

## 'अहिल्यानगरची एक्सप्रेस' दिव्यांगी लांडे हिला सिनिअर राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धेत ब्रॉन्झ पदक

नगर – भुवनेश्वर, उडीसा या ठिकाणी सुरू असलेल्या ६५ व्या राष्ट्रीय सिनिअर ॲथलेटिक्स स्पर्धेत नगरची एक्सप्रेस राष्ट्रीय खेळाडू दिव्यांगी लांडे हिने ४ बाय १०० मीटर रिले स्पर्धेत ४६.२१ सेंकदाची वेळ नोंदवत महाराष्ट्राला ब्रॉन्झ मेडल मिळवून दिले. महाराष्ट्राच्या रिले संघाने दमदार कामगिरी करत हे यश मिळवले. या रिले संघामध्ये प्राजंली पाटील, दिव्यांगी लांडे, ऐष्वर्या मिश्रा, हरीता बद्रा यांचा समावेश होता. दिव्यांगी लांडे ही भुवनेश्वर, उडीसा सिनिअर गट राष्ट्रीय स्पर्धेतील सर्वात कमी वयाची खेळाडू होती.



महाराष्ट्राची उत्कृष्ट धावपटू व अहिल्यानगरची एक्सप्रेस म्हणून दिव्यांगी लांडे ओळखली जाते. दिव्यांगीने आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व राज्य अजिंक्यपद स्पर्धेमध्ये सुवर्ण कामगिरी केली आहे. हरियाणा, रोहतक येथे झालेल्या ६४ व्या शालेय राष्ट्रीय स्पर्धेत रिलेमध्ये सुवर्णपदक, पंजाब येथे झालेल्या ६५ व्या शालेय राष्ट्रीय स्पर्धेत १००, २०० मीटर स्पर्धेत ब्रॉन्झ पदक व बिहार, पटना येथ झालेल्या ६७ व्या राष्ट्रीय षालेय स्पर्धेत १०० मीटर स्पर्धेत सिल्व्हर मेडल प्राप्त केले आहे. तसेच आसाम, गुवाहाटी येथे ३७ व्या ज्युनिअर राष्ट्रीय स्पर्धेत १०० मीटर व रिलेमध्ये सिल्व्हर मेडल मिळवले आहे. तसेच दिव्यांगी हिने अनेक राज्य, जिल्हा पातळीवर सुवर्णपदक मिळविलेले आहे. दिव्यांगी ही राष्ट्रीय कबड्डी खेळाडू कृष्णा लांडे यांची कन्या आहे. तसेच श्रीरामपूर येथील रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. दिव्यांगीला शारीरिक शिक्षण संचालक डॉ.विजय म्हस्के व क्रीडा शिक्षक संभाजी ढेरे, क्रीडा मार्गदर्शक कोच गणेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.




जितो राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करणारे अहिल्यानगर चॅप्टरचे खेळाडू.

## जितो राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत अहिल्यानगर चॅप्टरच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी

नगर – जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) यांच्या वतीने चेन्नई येथे जितो राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा २०२६ नुकत्याच घेण्यात आल्या. बॅडमिंटन, टेबल टेनिस, लॉन टेनिस, बुद्धिबळ, ॲथलेटिक्स, जलतरण यांसारख्या विविध क्रीडा प्रकारांचा यात समावेश होता. स्पर्धेत जितो अहिल्यानगर चॅप्टरचे प्रतिनिधित्व करत नगरच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली.

या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी अहिल्यानगरमधील विविध भागांतून खेळाडूंची निवड प्रक्रिया राबविण्यात आली. अंतिम निवडीअंती जितो अहिल्यानगर चॅप्टरतर्फे अंश चोरडिया, नामित फिरोदिया, ऋषभ भन्साळी, नक्ष गांधी, मीत दुधेडिया, चिराग दुधेडिया, जिनम संकलेचा, मोहित गांधी, पुरब गांधी, तिर्थेश चोरडिया आणि अर्हम कर्नावट यांनी राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेत नक्ष गांधी यांनी बुद्धिबळामध्ये रौप्य पदक मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली, तर अंश चोरडिया यांनी टेबल टेनिसमध्ये कांस्य पदक पटकावून जितो अहिल्यानगर चॅप्टरचा गौरव वाढवला.

या खेळाडूंना जितो अहिल्यानगर चॅप्टरचे अध्यक्ष अलोक मुनोत, मुख्य सचिव तुषार कर्नावट, सल्लागार कमिटी सदस्य अमित मुथा, विजय गुगळे, क्रीडा विभागाचे संयोजक अभिनंदन भन्साळी, सहसंयोजक हर्षद कर्नावट यांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि सतत सहकार्य लाभले. त्यांच्या प्रयत्नांमुळे खेळाडूंमध्ये आत्मविश्वास व स्पर्धात्मक ऊर्जा निर्माण झाली. या टिमचे व्यवस्थापक यश कासलीवाल होते.

## शांततेचा संदेश देणाऱ्या 'रोटरी पीस ट्री' चे उद्‌घाटन

### साईबन कृषी पर्यटन क्षेत्रात आगळेवेगळे वृक्षारोपण

नगर – येथील साईबन कृषी पर्यटन क्षेत्रात शांततेचा संदेश देणाऱ्या रोटरी पीस ट्री चे उद्‌घाटन झाले. सदर प्रसंगी रोटरी विश्वातील उच्च पदस्थ दोन रोटरी प्रांतपाल यांची खास उपस्थिती लाभली तसेच रोटरी ॲक्शन ग्रुप फॉर पीसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सौ. स्मिता विखणकर प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होत्या अशी माहिती साईबनच्या संचालिका तसेच रोटरी पीस कमिटीच्या अध्यक्षा डॉ. सुधा कांकरिया यांनी दिली.

रोटरी पीस ट्री चे उद्घाटन प्रांतपाल डि ३१३२ सुधीर लातुरे, प्रांतपाल डि ३१३१ संतोष मराठे, रोटरी ॲक्शन ग्रुप फॉर पीसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सौ. स्मिता विखणकर, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते झाले व नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी उपक्रमातील ५० झाडांचे ही या वेळेस वृक्षारोपण करण्यात आले.



साईबन कृषी पर्यटन क्षेत्रात शांततेचा संदेश देणाऱ्या रोटरी पीस ट्री चे उद्‌घाटन करण्यात आले.

प्रांतपाल संतोष मराठे म्हणाले की रोटरीच्या कार्यप्रणालीमध्ये जागतिक शांततेला प्राधान्य देण्यात आले असुन समाजामध्ये सामंजस्य, शांतता लाभावी यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. साईबन कृषी पर्यटन क्षेत्रातील हे रोटरी पीस व हार्मनी सेंटरचे उद्घाटन मागील वर्षी माझ्याच हस्ते झाले होते व आज रोटरी पीस ट्री च्या ही उद्घाटन प्रसंगी मी उपस्थित आहे हा एक गोड योगायोग आहे. या पीस सेंटरच्या माध्यमातुन मागील वर्षी हजारो व्यक्ती व बालकांना शांततेचा संदेश लाभला या बद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. व रोटरी पीस ट्री हे एक एकता व शांततेचे प्रतिक आहे असे ते म्हणाले.

प्रांतपाल सुधीर लातुरे म्हणाले की डॉ. सुधा कांकरिया यांच्या पुढाकाराने डि ३१३२ मधील १०० क्लबच्या माध्यमातुन समाजात शांतता लाभावी यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत. रोटरी क्लब ऑफ अ.नगर हा पहिला पीस बिल्डर क्लब ठरला असुन येथील रोटरी पीस व हार्मनी सेंटर ही शांततेचा व एकतेचा संदेश देणारे पहिले केंद्र ठरले आहे. आज रोटरी पीस ट्री च्या उद्घाटनाने एक नवीन भर त्यात पडली असुन प्रेम – शांती व सामंजस्य याचे हे प्रतिकच आहे.

स्मिता विखणकर म्हणाल्या की, आज या परिसरात येऊन मानसिक शांतीची अनुभुती होत आहे. वृक्ष सावली देतात, अन्न–धान्य, फुल–फळ देतात तसेच हे रोटरी पीस ट्री नक्कीच प्रेम, आनंद, शांती, शक्ती देऊन समाजाचे पालन पोषण करेल याची खात्री वाटते. आज जगात युध्दाचे वातावरण असतांना शांतीची खरी गरज आहे. समाजामध्ये ही अनेक कारणांमुळे अशांतता व अस्थिरता तसेच तंटे वादावादी वाढत चालली आहे. अशा वेळेस रोटरी पीस ट्री हे सर्व धर्म समभावाचा संदेश देत शांतता निर्माण करत आहे. मी सर्वांचे अभिनंदन करते.

सुरूवातीस रोटरी क्लब ऑफ अ.नगरच्या वतीने उपाध्यक्ष सुहास क्षिरसागर यांनी स्वागत केले. डॉ. सुधा कांकरिया यांनी रोटरी पीस ट्री ची निर्मिती व उद्देश बाबत माहिती दिली, डॉ. प्रकाश कांकरिया यांनी साईबनची माहिती देत वनश्री पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल नमुद केले.

कार्यक्रमाची सांगता शांततेच्या प्रतिज्ञेने झाली. सचिव संदिप ठोंबे यांनी आभार मानले.

सदर प्रसंगी रोटरी क्लब पुणे हिलसाईड चे अध्यक्ष राजेंद्र मेहेत्रे, तसेच रोटरी क्लब ऑफ अ.नगरचे निलेश वैकर, माधव देशमुख, रविंद्र राऊत, दिलीप कर्नावट, पुरूषोत्तम जाधव, सौ. नेहा जाधव, सुहास क्षिरसागर, सौ. स्नेहल क्षिरसागर, नितिन थाडे, धनंजय जाधव यांच्या वतीने सोमनाथ जाधव हे उपस्थित होते.




# अतिथंड पाणी पिण्यामुळे शरीराचे नुकसान



लाईफस्टाईल

गेल्या महिनाभरात उष्माघाताने अनेकांना रुग्णालयात दाखल करावे लागले असून काहींचा मृत्यूही झाला आहे. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी नागरिकांना जास्तीत जास्त पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो; मात्र हे पाणी योग्य पद्धतीने पिणेही तितकेच महत्वाचे आहे. उकाड्यामुळे घसा कोरडा पडत असल्यामुळे अनेकजण तहान भागवण्यासाठी फ्रीजमधील थंड पाणी पितात; पण अतिथंड पाण्यामुळे शरीराचे मोठे नुकसान होऊ शकते.

कडक उन्हातून आल्यावर बर्फासारखे थंड पाणी पिणे अनेकांसाठी सुखद वाटू शकते; मात्र ही सवय आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक आहे. अतिथंड पाणी पचनसंस्थेसाठी त्रासदायक ठरू शकते. तसेच त्यामुळे अन्ननलिकेत आकडी निर्माण होऊन पोटदुखी आणि छातीत तीव्र वेदना होऊ शकतात. हा प्रकार अगदी बर्फाचे थंड पेय पिल्यावर डोके सुन्न होण्यासारखाच आहे. शरीराचे तापमान आणि ३२ अंश डिग्रीपर्यंत थंड असलेल्या बर्फासारख्या थंड पाण्याचे तापमान यात खूप मोठा फरक असतो. त्यामुळे शरीरात आकुंचन निर्माण होते, हृदयाचे ठोके मंदावतात आणि रक्ताचे तापमानही कमी होऊ शकते. बर्फासारखे थंड पाणी पिल्याने थेट स्ट्रोक येण्याची शक्यता खूपच कमी असली, तरी काही प्रकरणांमध्ये मात्र माणूस तात्पुरता बेशुद्ध पडू शकतो.

काही दुर्मीळ घटनांमध्ये थंड पेय घेतल्यानंतर लोक बेशुद्ध पडल्याच्या घटना घडल्या आहेत. याचा उष्णतेशी थेट संबंध नसतो. गरम किंवा थंड हवामानातही हे होऊ शकते. ही एक मज्जासंस्थेशी संबंधित प्रतिक्रिया असून ती उन्हाळ्यात किंवा हिवाळ्यात कधीही घडू शकते. उष्माघात किंवा अतिउष्णतेचा त्रास होत असलेल्या व्यक्तींनी शरीराच्या तापमानाशी जुळणारे पाणी पिण्याचा सल्ला दिला आहे. अतिथंड पाणी अन्ननलिकेद्वारे पोटात गेल्यानंतर शरीरातील 'वॅगस नर्व्ह' नावाच्या नसा अचानक उत्तेजित होतात. या नसा मेंदूला एक तीव्र सिग्नल पाठवतात. त्यामुळे रक्तदाब अचानक कमी होऊन ती काही काळासाठी बेशुद्ध पडू शकते.

**अतिथंड पाणी पिण्याचे धोके**

* अतिथंड पाण्यामुळे घशातील मऊ उतींना सूज येऊ शकते.
* कपाळाच्या नसा आकुंचन पावतात. त्यामुळे मायग्रेनचा त्रास असलेल्या लोकांना तीव्र डोकेदुखी सुरू होऊ शकते.
* आतडे आणि पोटातील स्नायू कडक होतात. त्यामुळे अन्नाचे पचन नीट होत नाही आणि बद्धकोष्ठतेचा त्रास होतो.

# इबोलाने जगाची उडवली झोप




व्याधी विचार

इबोला विषाणूच्या रुग्णसंख्येत वेगाने वाढ होत असल्याने जागतिक आरोग्य संघटनेने याला गंभीर सार्वजनिक आरोग्य आणीबाणी म्हणून घोषित केले आहे. सध्या भारतात या विषाणूचा एकही रुग्ण आढळलेला नसला, तरी आफ्रिकेतील वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर भारताने खबरदारीचे उपाय सुरू केले आहेत. विमानतळांवर परदेशातून येणाऱ्या प्रवाशांची तपासणी, आरोग्य तपासणी आणि देखरेख वाढविण्यात आली आहे.

**इबोला विषाणू म्हणजे काय?**

इबोला हा अत्यंत धोकादायक आणि जीवघेणा विषाणूजन्य आजार आहे. पूर्वी याला 'इबोला हेमोरेजिक फीव्हर' किंवा 'इबोला रक्तस्रावी ताप' असेही म्हटले जात असे. हा विषाणू शरीरातील विविध अवयवांवर परिणाम करतो आणि रक्तवाहिन्यांचे नुकसान करतो. त्यामुळे शरीराच्या आतील तसेच बाहेरील भागातून रक्तस्राव होऊ शकतो. उपचार वेळेवर न मिळाल्यास हा आजार जीवघेणा ठरू शकतो.

**इबोलाची लक्षणे कोणती?**

इबोला विषाणूची लागण झाल्यानंतर साधारणपणे २ ते २१ दिवसांच्या कालावधीत लक्षणे दिसू लागतात. सुरुवातीला ही लक्षणे सामान्य फ्लूसारखी वाटू शकतात; मात्र नंतर ती गंभीर रूप धारण करतात.

**प्रारंभीची लक्षणे :**

अचानक तीव्र ताप येणे
प्रचंड अशक्तपणा आणि थकवा
स्नायू व सांध्यांमध्ये वेदना
डोकेदुखी
घशात खवखव किंवा वेदना

**गंभीर लक्षणे :**

उलट्या होणे
जुलाब किंवा अतिसार
त्वचेवर पुरळ येणे
यकृत आणि मूत्रपिंडाच्या कार्यावर परिणाम होणे
डोळे, नाक, कान, हिरड्या किंवा इतर अवयवांमधून रक्तस्राव होणे
शरीरातील अंतर्गत अवयवांमध्ये रक्तस्राव होणे

**इबोला विषाणू कसा पसरतो?**

इबोला हा हवेतून पसरणारा आजार नाही. तो पाणी, अन्न किंवा डासांच्या चाव्यामुळेही पसरत नाही. हा विषाणू संक्रमित व्यक्तीच्या शरीरातील द्रवांशी थेट संपर्क आल्यास पसरतो.

**संसर्ग पसरण्याची प्रमुख कारणे :**


संक्रमित व्यक्तीच्या रक्ताशी संपर्क
लाळ, घाम, उलटी किंवा मूत्र यांच्याशी संपर्क
वीर्य किंवा इतर शारीरिक द्रवांशी संपर्क
संक्रमित व्यक्तीने वापरलेले कपडे, चादरी किंवा बिछाना वापरणे
दूषित सुई, इंजेक्शन किंवा वैद्यकीय उपकरणांचा वापर

**इबोलापासून बचाव कसा करावा?**

इबोलाचा संसर्ग टाळण्यासाठी काही मूलभूत खबरदारी घेणे आवश्यक आहे.
संक्रमित व्यक्तीच्या रक्त, लाळ, घाम, उलटी किंवा इतर शारीरिक द्रवांशी संपर्क टाळावा.
रुग्णाने वापरलेल्या वस्तूंना हात लावू नये.
हात साबण आणि पाण्याने वारंवार स्वच्छ धुवावेत.
आवश्यकतेनुसार अल्कोहोलयुक्त हँड सॅनिटायझरचा वापर करावा.
आरोग्य कर्मचाऱ्यांनी हातमोजे, मास्क आणि संरक्षक साधनांचा वापर करावा.

# जिने चढताना गुडघे का दुखतात?

सरळ चालताना काही त्रास होत नाही; पण जिने चढायला लागले, की गुडघा दुखायला लागतो. हा अनुभव अनेकांना येतो. विशेषतः मध्यमवयीन व्यक्ती आणि बैठ्या कामामुळे स्नायू कमकुवत झालेल्या लोकांमध्ये ही समस्या प्रामुख्याने दिसून येते. मग प्रश्न असा, सपाट पृष्ठभागावर चालताना गुडघा दुखत नाही; पण जिने चढतानाच गुडघा का दुखतो?



आपल्याला दोन्ही गोष्टी सारख्याच वाटतात; पण शरीरासाठी त्या खूप वेगळ्या आहेत. सरळ चालताना शरीराचे वजन तुलनेने समान पद्धतीने वाटले जाते, गुडघ्यावरचा ताण नियंत्रित असतो, हालचाल रीदमिक असते; पण जिने चढताना शरीराचे पूर्ण वजन एका पायावर येते, गुडघ्याला शरीर वर उचलावे लागते. स्नायूंना जास्त ताकद लावावी लागते म्हणजेच, जिने चढताना गुडघ्यावरचा 'लोड' अचानक वाढतो. गुडघ्याच्या पुढच्या भागात एक लहान हाड असत याला 'पटेला' म्हणतात. जिने चढताना पटेला आणि मांडीचे हाड (षर्शीी) यांच्यात घर्षण होऊन जास्त दाब तयार होतो. विशेषतः जिने चढताना बसलेल्या जागेतून उठताना, खाली बसताना हा दाब वाढतो. स्नायू कमकुवत असतील, हालचाल नियंत्रित नसेल, वजन जास्त असेल तर हा ताण वेदनांमध्ये बदलू शकतो.

व्याधी विकार

**खुब्याचा आणि गुडघ्याचा संबंध**

हा मुद्दा खूप महत्त्वाचा आहे. अनेक वेळा गुडघा दुखतो; पण मूळ कारण खुब्यात असते. खुब्याच्या आजूबाजूचे स्नायू कमकुवत असतील, शरीराचा तोल नीट राखला जात नसेल तर जिने चढताना गुडघ्यावर जास्त भार पडतो. म्हणूनच फिजिओथेरेपीमध्ये फक्त गुडघ्यावर उपचार केले जात नाहीत, तर खुब्याच्या आजूबाजूच्या स्नायूंची कार्यक्षमता, घोट्याचा सांधा आणि चालण्याची पद्धत हे सगळे तपासले जाते.

# हृदयाच्या बळकटीसाठी

आहारतंत्र

हृदयाचं आरोग्य जपण्यासाठी व्यायामासोबतच पोषक आहारही गरजेचा असतो. आहारातून मिळणारी विविध जीवनसत्त्वं, खनिजं हृदयाला बळकटी देतात.



हृदयाची तंदुरुस्ती वाढवणाऱ्या काही पोषक घटकांविषयी...

बी १२ या जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे हृदयाचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं. हे जीवनसत्त्व हृदयाला बळकटी देतं. बी १२ लाल रक्तपेशींच्या निर्मिती अधिक वेगाने होते. चिकन, मासे, अंडी हे पदार्थ बी १२ चा उत्तम स्रोत आहेत. प्राणीजन्य पदार्थांमध्ये हे जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात असतं. दही, दूध, पनीर, चीज अशा पदार्थांमधूनही 'बी १२' मिळतं.


'क' जीवनसत्त्वामुळे हृदयविकाराला प्रतिबंध करता येतो. आंबट फळांमध्ये 'क' जीवनसत्त्व असतं. लिंबू, संत्री, पेरू, किवी, स्ट्रॉबेरी, पपई अशी फळं आणि फ्लॉवर, ब्रोकोलीसारख्या भाज्यांमधून शरीराला 'क' जीवनसत्त्व मिळतं. ओमेगा ३ फॅटी ॲसिड्सही हृदयाला बळकटी देतात.

# च्युइंग गम खाताय, सावधान!

डॉ. मेघा दळे

समजून घ्या

बहुतेक सर्वांना च्युइंगम आवडतं. काही लोक ते 'माउथ फ्रेशनर' म्हणून खातात तर काही त्याच्या गोड चवीसाठी खातात. पण च्युइंगम खाणं आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतं.



**च्युइंगम म्हणजे काय?**

च्युइंगमचा मुख्य घटक म्हणजे 'गम बेस'. पूर्वी 'गम बेस' चिकल (झाडाचे राळ) सारख्या नैसर्गिक पदार्थांपासून बनवलं जाई; पण आजकाल बहुतेक च्युइंगम्सचा 'गम बेस' कृत्रिम पॉलिमरपासून बनलेला असतो. तो प्लास्टिकसारखाच असतो.

**गम बेसमध्ये काय असते?**

* पॉलीव्हिनाईल ॲसिटेट
* पॉलीइथिलीन
* रबर किंवा रेझिन
* प्लास्टिसायझर्स (सॉफनिंग एजंट्स)

हे सर्व प्लास्टिक बनवण्यासाठी वापरले जाणारे कृत्रिम पदार्थ आहेत.

**नवीन अभ्यास आणि संशोधन**

ताज्या संशोधन आणि अभ्यासात धक्कादायक गौप्यस्फोट झाले आहेत. कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या अभ्यासानुसार, एका ग्रॅम च्युइंगममधून सरासरी १०० मायक्रोप्लास्टिकचे तुकडे बाहेर पडतात. काही पदार्थ ६०० हून अधिक तुकडे बाहेर टाकू शकतात. च्युइंगमचा एक सामान्य तुकडा सुमारे १.५ ग्रॅम वजनाचा असतो. म्हणजे दररोज च्युइंगम चघळणारी व्यक्ती दरवर्षी सुमारे ३०,००० मायक्रोप्लास्टिक कण गिळू शकते.

च्युइंगममध्ये वापरले जाणारे पॉलिमर गमला चवदार बनवतात. ते बहुतेकदा पेट्रोलियम पासून बनवलेले कृत्रिम प्लास्टिक असतात. काही झाडाच्या रसापासून बनवलेले नैसर्गिक पॉलिमरदेखील असतात. दोन्ही प्रकारच्या डिंकांमध्ये मायक्रोप्लास्टिक्स आढळले आहेत. हे मायक्रोप्लास्टिक कण इतके लहान आहेत, की ते लाळेसह तोंडात जातात आणि नंतर गिळले जातात. यातील काही कण नॅनोप्लास्टिक्सच्या स्वरूपातदेखील असतात. ते शरीराच्या पेशींपर्यंत पोहोचू शकतात. त्यामुळे आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.

**प्लास्टिक चावत आहोत का?**

सोप्या भाषेत सांगायचं तर आजच्या च्युइंगममध्ये प्लास्टिकसारखे कृत्रिम पदार्थ असतात. ते फक्त चघळण्यासाठी बनवले जातात. च्युइंगम ही चघळण्याची गोळी आहे. ती गिळू नये. चुकून गिळले तरी ते पचनाशिवाय शरीराबाहेर पडतं. च्युइंग गम जास्त प्रमाणात गिळणं हानिकारक असू शकते.

# बुरशीच्या नवीन प्रकरणामुळे त्वचारोग

त्वचेवर आलेला तो खाज सुटणारा चट्टा हा केवळ एक सामान्य नायटा असावा असे वाटत असेल तर वेळीच सावध व्हा! त्याच्यावर उपचार करणे अत्यंत कठीण जात आहे. 'ट्रायकोफायटन इंडोटिनी' नावाच्या बुरशीच्या नवीन प्रकारामुळे हा संसर्ग होत आहे. हा संसर्ग अतिशय वेगाने पसरतो आहे, यामुळे शरीराला प्रचंड खाज सुटते आणि काही प्रकरणांमध्ये सामान्यतः दिली जाणारी बुरशीरोधक औषधेही यावर परिणाम करत नाहीत.



नायटा होणे ही काही नवीन गोष्ट नाही; परंतु हा नवीन प्रकार लोकांना होणाऱ्या नेहमीच्या संसर्गापेक्षा खूप वेगळा आहे. त्यामुळेच डॉक्टरांना आता अधिक काळजीपूर्वक उपचार करावे लागत आहेत. अलीकडच्या वर्षांमध्ये भारतात 'ट्रायकोफायटन इंडोटिनी' या नवीन प्रकारामुळे होणाऱ्या आणि उपचारांना सहज दाद न देणाऱ्या बुरशीजन्य संसर्गात मोठी वाढ झाली आहे. हा संसर्ग खूप सहज पसरतो आणि यामुळे त्वचेवर मोठा, तीव्र खाज सुटणारा नायटा तयार होतो. विशेष म्हणजे उपचार केल्यानंतरही हा संसर्ग वारंवार उलटून (परत परत) येतो.

यातली सर्वात मोठी चिंतेची बाब म्हणजे 'ड्रग रेझिस्टन्स' म्हणजेच औषधांना दाद न देणे. याचा अर्थ असा, की बऱ्याच रुग्णांवर सामान्यतः वापरली जाणारी बुरशीरोधक औषधे प्रभावी ठरत नाहीत. परिणामी, रुग्णाचे उपचार दीर्घकाळ चालतात आणि संसर्ग पुन्हा पुन्हा होतो. सोप्या शब्दात सांगायचे, तर एखादा सामान्य चट्टा वाटत असेल तो प्रत्यक्षात असा संसर्ग असू शकतो. त्यासाठी पूर्णपणे वेगळ्या उपचार पद्धतीची गरज आहे.

जाणून घ्या

**हा संसर्ग कसा पसरतो?**

हा संसर्ग अतिशय सहजपणे पसरतो. संसर्ग झालेल्या व्यक्तीच्या थेट त्वचेच्या संपर्कात आल्यास त्यांचे टॉवेल, कपडे, अंथरूण किंवा जिमचे साहित्य वापरल्याने हा संसर्ग होऊ शकतो. याशिवाय जास्त घाम येणे आणि अस्वच्छता यामुळेही तो पसरतो. गर्दीच्या ठिकाणी तसेच उष्ण आणि दमट हवामानात हा संसर्ग पसरण्याचा धोका आणखी वाढतो.


**हा 'साधा नायटा' नाही हे कसे ओळखायचे?**

सामान्यतः बुरशीजन्य संसर्ग योग्य उपचारांनी बरा होतो; परंतु जर हा संसर्ग नेहमीपेक्षा जास्त आक्रमक वाटत असेल तर वेळीच तपासणी करून घेणे गरजेचे आहे.

# 'इंटरमिटंट फास्टिंग' सर्वांसाठी फायद्याचे नाही

जीवनशैली

आजकाल वजन कमी करण्यासाठी आणि तंदुरुस्त राहण्यासाठी 'इंटरमिटंट फास्टिंग' हा आहाराचा प्रकार मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय होत आहे. 'सोशल मीडिया'वरील माहिती, फिटनेस तज्ज्ञांचे सल्ले आणि आरोग्याबाबत वाढती जागरूकता यामुळे अनेक लोक हा पर्याय स्वीकारत आहेत. या पद्धतीमध्ये ठराविक कालावधीत अन्न सेवन केले जाते आणि उर्वरित वेळ उपवास केला जातो. काही लोकांना यामुळे वजन नियंत्रणात ठेवणे, इन्सुलिनची कार्यक्षमता सुधारणे आणि पचनसंस्था अधिक सक्षम बनवणे यांसारखे फायदे मिळू शकतात; मात्र हा उपाय सर्वांसाठीच तितकाच उपयुक्त ठरेल असे नाही.



कोणतीही आहारपद्धती स्वीकारण्यापूर्वी व्यक्तीचे वय, आरोग्यस्थिती, जीवनशैली आणि वैद्यकीय इतिहास यांचा विचार करणे अत्यंत आवश्यक असते. योग्य मार्गदर्शनाशिवाय दीर्घकाळ उपाशी राहिल्यास काही व्यक्तींना अशक्तपणा, चक्कर येणे, ॲसिडिटी, डोकेदुखी आणि इतर आरोग्यविषयक तक्रारी उद्भवू शकतात. त्यामुळे विशेषतः आधीपासून एखादा आजार असलेल्या व्यक्तींनी डॉक्टरांचा सल्ला घेतल्याशिवाय 'इंटरमिटंट फास्टिंग' सुरू करू नये.

**कोणत्या लोकांनी इंटरमिटंट फास्टिंग टाळावे?**

मधुमेहाचे रुग्ण

मधुमेह असलेल्या व्यक्तींना दीर्घकाळ उपाशी राहणे धोकादायक ठरू शकते. विशेषतः इन्सुलिन किंवा रक्तातील साखर नियंत्रणासाठी औषधे घेणाऱ्या रुग्णांमध्ये रक्तातील साखरेची पातळी अचानक कमी होण्याची (हायपोग्लायसेमिया) शक्यता असते. त्यामुळे अशक्तपणा, घाम येणे, चक्कर येणे किंवा गंभीर परिस्थितीत बेशुद्ध पडण्याचाही धोका निर्माण होऊ शकतो.

ॲसिडिटी, गॅस्ट्रायटिस किंवा अल्सर असलेले रुग्ण

ज्यांना ॲसिडिटी, गॅस्ट्रायटिस, आम्लपित्त किंवा पोटातील अल्सरचा त्रास आहे, त्यांच्यासाठी जास्त वेळ उपाशी राहणे त्रासदायक ठरू शकते.

नवसंशोधन

## ई सिगारेट्स ठरताहेत घातक!

तंबाखू आणि धूम्रपानाच्या दुष्परिणामांबद्दल आपण जाणतो. सध्या ई सिगारेट्सचा वापर मोठ्या प्रमाणावर गेला जातो. तरुणाईला या ई सिगारेट्सची भुरळ पडली आहे. मात्र त्या नेहमीच्या सिगारेट्सपेक्षा घातक ठरू शकतात ही बाब एका संशोधनातून समोर आली आहे. ई सिगारेट्स तंबाखूपेक्षाही घातक असल्याचं हा अभ्यास सांगतो. यामुळे हृदयाचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं. ई सिगारेट्च्या वापराबाबत आजवर बरीच संशोधनं करण्यात आली आहेत. हे नवं संशोधन काही नव्या पैलूंवर प्रकाश टाकतं. २०१८ मध्ये जगभरातले जवळपास ३.६२ दशलक्ष विद्यार्थी ई सिगारेट्सच्या आहारी गेल्याचं आकडेवारी सांगते.



दंतारोग्य

## जपा दातांचं आरोग्य

सकाळी उठल्यावर आणि रात्री झोपण्याआधी दात घासणं पुरेसं असतं, हा एक गैरसमज आहे. आपल्या बऱ्याच चुकीच्या सवयी दातांसाठी घातक ठरू शकतात. अनेक कारणांमुळे दात खराब होतात.




बरेचजण रात्री झोपण्याआधी दात घासत नाहीत. मात्र ही सवय सकाळी दात घासण्याइतकीच महत्त्वाची ठरते. त्यामुळे आळस न करता रात्री दात घासून झोपा. टूथब्रशमुळेही दातांचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं. खूप टणक किंवा कठीण टूथब्रश वापरू नये. अशा ब्रशमुळे दातांवरचं एनामेल कमी होतं आणि दातांची झीज होण्याचा धोका वाढतो. फ्लॉसिंग म्हणजे दातांमध्ये अडकलेले अन्नकण काढून टाकणं. दात घासल्यानंतर फ्लॉसिंग करायला विसरू नका. f

डोळ्यांचे आरोग्य

## प्रदूषणाचा त्रास होतोय...

हवेतल्या घातक प्रदूषित कणांमुळे डोळ्यांना त्रास होतो. हे प्रदूषित कण डोळ्यांमधल्या पोकळ्यांमध्ये अगदी सहज जाऊन बसतात आणि आपल्या दृष्टीवर परिणाम करतात. प्रदूषित कणांमुळे डोळ्यांमधून पाणी येणं, डोळे सुजणं, खाज येणं, डोळे लाल होणं, दाह जाणवणं, डोळे कोरडे पडणं, अंधूक दिसणं असा त्रास होतो. या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता तातडीने नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. शिवाय प्रदूषित वातावरणात जाणं टाळावं. इतरही काही उपाय करता येतील. प्रदूषणाचा धोका टाळण्यासाठी भरपूर पाणी प्या. यामुळे शरीरातले विषारी घटक मूत्रावाटे बाहेर पडतात. पाण्यामुळे डोळ्यांमध्ये अश्रूंची निर्मिती होऊ लागते. यामुळे डोळे कोरडे पडत नाहीत.



आजीबाईचा बटवा


## प्या हळदीचं दूध

बरेचजण हळद घातलेलं दूध पितात. हे दूध खूप लाभदायी ठरतं. सर्दी-खोकल्यावरचा घरगुती उपाय म्हणून हळद घातलेलं दूध प्यायलं जातं. हळद घातलेल्या दुधामुळे हाडं बळकट होतात. रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठीही हळद घातलेलं दूध प्यावं. हळद घातलेल्या दुधामुळे शरीरातली विषारी द्रव्यं बाहेर पडतात तसंच पचनक्रिया सुधारते. अपनच, गॅस अशा समस्या दूर करण्यासाठी हळद घातलेलं दूध नियमितपणे प्यावं. निद्रानाश, ताणतणाव अशा तक्रारींवरही हळदीचं दूध गुणकारी ठरतं. हळद घातलेलं गरम दूध प्यायल्यामुळे दमा, ब्रोंकायटिस, फुफ्फुसात कफ साठणं, सायनस अशा विकारांची तीव्रता कमी होते. या दुधामुळे शरीर अधिक सक्षम होतं.



# सौर ऊर्जेच्या विविध वापराच्या प्रकरणांचा उपयोग



उत्पादन उद्योग, गतिशीलता आणि वाहतूक, देखभाल व पुनर्वापर प्रक्रियांद्वारे उत्पादने आणि सामग्री चलनात ठेवली जाणारी प्रणाली आणि भौतिक नाविन्यपूर्णतेत निव्वळ शून्य उत्सर्जन साध्य करण्यासाठी हवामानातील बदलांच्या परिणामांशी जुळवून घेणाऱ्या पद्धतींचा अवलंब करताना, आपण आपल्या ऊर्जा स्त्रोतांच्या वापरामध्येही जीवाश्म इंधनांपासून अक्षय ऊर्जेपर्यंत– विशेषत: सौर ऊर्जा असा मूलभूत बदल करत आहोत.





१. अक्षय ऊर्जा स्त्रोत म्हणून सौर ऊर्जेची मोठी क्षमता

उत्पादन उद्योग, गतिशीलता आणि वाहतूक, देखभाल व पुनर्वापर प्रक्रियांद्वारे उत्पादने आणि सामग्री चलनात ठेवली जाणारी प्रणाली आणि भौतिक नाविन्यपूर्णतेत निव्वळ शून्य उत्सर्जन साध्य करण्यासाठी हवामानातील बदलांच्या परिणामांशी जुळवून घेणाऱ्या पद्धतींचा अवलंब करताना, आपण आपल्या ऊर्जा स्त्रोतांच्या वापरामध्येही जीवाश्म इंधनांपासून अक्षय ऊर्जेपर्यंत– विशेषत: सौर ऊर्जा असा मूलभूत बदल करत आहोत. स्वारस्यपूर्ण बाब अशी की, गेल्या दशकात सौर ऊर्जा निर्मितीच्या खर्चात ३०० टक्क्यांनी घट झाली आहे आणि आपण २०१६ मधील कोळशाच्या किमतीशी बरोबरी साधली आहे. सोलार फोटो वोल्टॅक्स (पीव्हीज) स्वीकारल्यापासून, अक्षय ऊर्जा इन्स्टॉलेशन्स २२ टक्क्यांहून अधिक वेगाने वाढत आहेत आणि आज जगभरात १ टेरावॉटपेक्षा अधिक सौर पॅनेल स्थापित आहेत. आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेच्या म्हणण्यानुसार, २०४० सालापर्यंत ७ टेरावॉटपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. याशिवाय, भारताने आतापर्यंत एकत्रितपणे ६३ गिगावॉट सोलर पीव्ही बसविण्यात उल्लेखनीय प्रगती केली आहे, ज्यापैकी १४ गिगावॉट २०२२ मध्ये स्थापित करण्यात आली होती. सौर–ऊर्जेवर चालणारी ग्रीन हायड्रोजन आणि सौर ऊर्जेवर चालणारी इलेक्ट्रिक वाहने स्वदेशी तंत्रज्ञानाने विकसित केली तर भारत १२० अब्ज अमेरिकी डॉलर्स किमतीच्या वार्षिक तेल आयातीत मोठ्या प्रमाणात कपात करू शकतो.

२. सौर ऊर्जेची निर्मिती केवळ उपयुक्ततेच्या बाबतीत वनस्पती आणि शहरी छतापर्यंत मर्यादित आहे.

३. सौर ऊर्जा निर्मितीमधील सर्वात लक्षणीय आव्हानांपैकी एक म्हणजे सूर्याच्या सतत हालचालींचे मापन करणे, ज्यामुळे केवळ मर्यादित वेळेतच (दुपारच्या सुमारास) सौर पॅनेलद्वारे सर्वाधिक ऊर्जा गोळा होऊ शकते. हा तिढा यांत्रिक ट्रॅकर्सद्वारे अंशतः सोडवला गेला आहे, ज्याद्वारे सूर्याच्या दिशेला तोंड करून सौर पॅनेल दिवसभर हलवला जातो. आज, सौर ऊर्जेची निर्मिती उपयुक्ततेच्या बाबतीत केवळ वनस्पती आणि

शहरी छतापर्यंत मर्यादित आहे. सौर ऊर्जेद्वारे दिली जाणारी सुनिश्चितता खूप मोठी आहे आणि ग्राहकांकरता सौर ऊर्जेला आपोआप निर्माण होणारा, दीर्घकालीन आणि शाश्वत पर्याय बनवण्याकरता, आपल्याला एका लक्षकेंद्री नाविन्यपूर्णतेची गरज आहे, जी उत्पादनांच्या विस्तृत श्रेणीचे सौर वापरात रूपांतर करू शकेल. उदाहरणार्थ, बाल्कनी, कुंपण, बाके, इमारतीचा दर्शनी भाग, खिडक्या आणि मोटार गाड्या हे सर्व सौर परावर्तित पृष्ठभाग बनवता येतात, जे केवळ हरित उत्पादन होते असे नाही, तर त्याद्वारे प्रति युनिट मोजता येईल असा आकर्षक थेट महसूलही मिळतो.

४. उष्ण कटिबंधीय देश असल्याने, भारत सौर ऊर्जा उत्पादनांचा विविध प्रकारे वापर करू शकतो आणि एकूण ऊर्जा पुरवठ्यात अक्षय ऊर्जेचे प्रमाण वाढवण्यासाठी आणि जीवाश्म इंधनापासून दूर जाण्याच्या माहितीपूर्ण योजनेत भारताला स्थान मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतो. 'कॉप २६' या संयुक्त राष्ट्रांच्या हवामान बदलपरिषदेतअक्षय ऊर्जेचा व्यापार करण्यासाठी एक सूर्य एक जग एक ग्रीड ची संकल्पना मांडण्यात आली आणि या संदर्भात, भारत अक्षय ऊर्जा महासत्ता बनण्याच्या स्थितीत आहे.

**नित्कर्ष :** सौर उर्जेचा योग्य प्रकारे करून आपला देश आर्थिक प्रगती करून स्वावलंबी तर होऊ शकतोच परंतु त्याच बरोबर जगातील प्रमुख महासत्ता बनण्याच्या दिशेने पुढे पाउल टाकू शकतो. या साठी गरज आहे आणखी संशोधन करून यातील उत्तोमोत्तम पर्याय शोधून मार्गक्रमण करण्याची.



**– डॉ. श्रीमती कल्पना डी. विधाते,**
**डिप्लोमा, पदवी (इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि पॉवर इंजिनिअरिंग), अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवी (कंट्रोल सिस्टिम्स), पीएच.डी.(ऊर्जा),**
**सहाय्यक प्राध्यापक,**
**इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभाग,**
**डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय,**
**अहिल्यानगर, महाराष्ट्र.**
**मोबईल नंबर : ८२७५९४२२३६**
**मेल आयडी:** ghadge.kalpana@gmail.com

AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

## सावेडीतील सरस्वती संगीतालयाची विद्यार्थिनी वैष्णवी फिसके हिला संगीत विशारद पदवी प्राप्त



नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळातर्फे घेण्यात आलेल्या संगीत परिक्षेत सावेडीतील तुळजाभवानी मंदिराच्या मागील बाजूस असलेल्या उज्वल हौसिंग सोसायटीमधील सरस्वती संगीतालयाच्या विद्यार्थ्यांनी चांगले यश मिळवले आहे. यात वैष्णवी फिसके हीने प्रथम श्रेणीत संगीत विशारद ही पदवी प्राप्त केली असुन ती केंद्रत प्रथम आली आहे.

या संगीतालयातील परिक्षा निहाय निकाल – प्रवेशिका प्रथम – प्रत्युष भणगे, श्रुती पोळ (प्रथम श्रेणी)., उपांत्य विशारद– प्रतिक्षा झिने (प्रथम श्रेणी) असा आहे.

या यशाबद्दल सरस्वती संगीतालयाच्या संचालिका सौ. अनुजा संदिप कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. यावेळी त्यांनी संगीताची साधना करताना रियाज खुप महत्वाचा असुन आपल्या गुरूंकडून मिळणारे मार्गदर्शन व विद्यार्थ्यांनी केलेला रियाज या जोरावरच यश मिळते असे सांगितले.

## आरोही संगीत विद्यालयात तबला, गायन व हार्मोनियम प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

नगर – आरोही संगीत विद्यालयाच्या वतीने तबला, हिंदुस्थानी शास्त्रीय गायन व हार्मोनियम प्रशिक्षण वर्ग नियमितपणे सुरू असून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. विद्यालयामध्ये लहान मुलांपासून प्रौढांपर्यंत सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांना संगीताचे शास्त्रोक्त प्रशिक्षण दिले जाते.

विद्यार्थ्यांना अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळाच्या परीक्षांची तयारी, मंचावर सादरीकरणाचे प्रशिक्षण तसेच भजन, भावगीत, भक्तिगीत व शास्त्रीय संगीतासाठी विशेष मार्गदर्शन केले जाते. विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी गंधर्व परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून विद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे.

विद्यालयाचे संस्थापक स्वप्निल खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्ग सुरू असून शितल खराडे, महेश खोपटीकर यांचेही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभत आहे. इच्छुक विद्यार्थी व पालकांनी प्रवेशासाठी आरोही संगीत विद्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ॲडव्हान्स डिप्लोमा इन एक्स–रे रेडिओग्राफी टेक्निक्स अभ्यासक्रमाच्या द्वितीय सत्राचा निकाल जाहीर


वसीम शेख


उमेश कानोजा


वैभवी पेंढारकर

नगर – सिद्धी इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल सायन्स अँड टेक्नॉलॉजी, श्रीरामपूर येथे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या ॲडव्हान्स डिप्लोमा इन एक्स–रे रेडिओग्राफी टेक्निक्स या अभ्यासक्रमाच्या द्वितीय सत्राचा निकाल नुकताच जाहीर झाला असून संस्थेने १०० टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे.

या परीक्षेत वसीम शेख (८९.२०%) यांनी प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. उमेश कानोजा (८३.९०%) यांनी द्वितीय तर वैभवी पेंढारकर (८३.००%) यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. हर्षद चोरडिया यांनी सांगितले की, ॲडव्हान्स डिप्लोमा इन एक्स–रे रेडिओग्राफी टेक्निक्स हा दीड वर्षांचा रोजगाराभिमुख अभ्यासक्रम असून यामधून सरकारी व खाजगी क्षेत्रात नोकरीच्या तसेच स्वयंरोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होतात. विज्ञान शाखेतील पदवीधर विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

## सीए फायनल परीक्षेत अभिषेक देवचके यांची यशस्वी कामगिरी

नगर – मे २०२६ मध्ये झालेल्या चार्टर्ड अकाउंटंट (सीए) फायनल परीक्षेत अभिषेक प्रशांत देवचके यांनी उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या कुटुंबासह अहिल्यानगरच्या शैक्षणिक क्षेत्राचा गौरव वाढविला आहे.



अभिषेक यांचे प्राथमिक शिक्षण सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूल, अहिल्यानगर येथे झाले. त्यानंतर त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण अहमदनगर कॉलेज, अहिल्यानगर येथे पूर्ण केले. शिक्षणादरम्यान त्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर सीए होण्याचे स्वप्न साकार केले.

सीए अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने त्यांनी पुणे येथील BDO या संस्थेमध्ये आर्टिकलशिप पूर्ण केली. तसेच JO BP येथेही व्यावसायिक प्रशिक्षण घेत वित्तीय व लेखापरीक्षण क्षेत्रातील अनुभव संपादन केला. या अनुभवाचा त्यांना सीए फायनल परीक्षेत मोठा लाभ झाला.

अभिषेक हे प्रशांत देवचके व प्रणिता देवचके यांचे पुत्र असून अमेय देवचके यांचे बंधू आहेत.

## अवकाळी पावसामुळे बाधित शेतकऱ्यांसाठी २१ कोटी ३० लाख रुपयांच्या मदतीस मंजुरी

नगर – एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे बाधित झालेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी २१ कोटी ३० लाख ३७ हजार ४०० रुपयांच्या अनुदानास शासनाने मंजुरी दिली असून, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी सादर केलेल्या अंतिम सुधारित अहवालानुसार जिल्ह्यातील १९९ गावांतील २१ हजार ४९५ शेतकरी या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झाले असून, १२ हजार ३४६.३९ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. तालुकानिहाय आकडेवारीनुसार नेवासा तालुक्यात सर्वाधिक १० हजार २९४ शेतकरी व ६ हजार ३३५.७२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. त्याखालोखाल राहुरी, पारनेर, राहाता व कोपरगाव तालुक्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

ही मदत शासनाच्या २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयानुसार ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या पिकांसाठी मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार जिरायत क्षेत्रासाठी प्रतिहेक्टर ८ हजार ५०० रुपये, बागायत क्षेत्रासाठी प्रतिहेक्टर १७ हजार रुपये व फळबाग क्षेत्रासाठी प्रतिहेक्टर २२ हजार ५०० रुपये दराने अनुदान देण्यात येणार आहे.

चालू हंगामात यापूर्वी वितरित करण्यात आलेल्या मदतीच्या निधीमध्ये या मंजूर निधीचा समावेश नसल्याची खात्री करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच एका हंगामात विहित दराने केवळ एकदाच मदत देण्यात येईल, याची दक्षता घेण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला देण्यात आले आहेत.

लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात वितरित करण्यात येणार असून, कोणत्याही लाभार्थ्यास दुबार मदत मिळणार नाही याची तहसील कार्यालयांनी कटाक्षाने दक्षता घ्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. मंजूर निधीचा वापर केवळ मंजूर उद्देशासाठीच करण्यात यावा. निधी खर्च करताना शासन निर्णयातील सर्व सूचना, निकष, अटी व शर्तींचे काटेकोर पालन करावे. नैसर्गिक आपत्तीबाबत विहित अटींची पूर्तता झाल्यानंतरच मदतीचे वितरण करण्यात यावे, अशा सूचनाही आदेशात देण्यात आल्या आहेत.

## 'पोकलेन'च्या चालकाला मारहाण करून लुटले

### ५० हजारांची रोकड, २७० लिटर डिझेल केले लंपास, तिघांवर गुन्हा दाखल

नगर – शेततळे खोदण्याचे काम सुरू असलेल्या ठिकाणी, पोकलेन मशीनवरील चालकाला बेदम मारहाण करून रोख रकमेसह डिझेल असा एकूण ७८ हजार रुपयांचा माल बळजबरीने लुटून नेण्यात आल्याची घटना पारनेर तालुक्यातील नांदूर पठार शिवारात घडली आहे. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या संदर्भात हनुमंत शंकर भोसले (वय ४४, रा. शिरापूर, ता. पारनेर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या मालकीचे पोकलेन मशीन असून ते कामासाठी इतरांना भाड्याने देतात. नांदूर पठार येथील एका जागेत अमित मोहन घनदाट यांचे शेततळे खोदण्याचे काम सुरू आहे. या ठिकाणी फिर्यादी हनुमंत भोसले यांनी त्यांचे पोकलन मशीन कामासाठी पाठवले होते. २५ जून रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास या मशीनवर काम करणारा चालक संतोष हनुमंत जमादार (रा. आळंद, जिल्हा गुलबर्गा, कर्नाटक) हा तिथे हजर असताना आरोपी शुभम राजदेव, आर्यन बेलकर, सूरज चिकणे (सर्व रा. काळेवाडी, ता. पारनेर) हे तेथे आले आणि त्यांनी पोकलेन मशीन चालकाला बेदम मारहाण केली. आरोपींनी चालकाला दुखापत करत जबरदस्तीने फिर्यादीकडील ५० हजार रुपये रोख रक्कम आणि पोकलेन मशीनसाठी आणलेले २८ हजार रुपये किमतीचे २७० लिटर डिझेल, असा एकूण ७८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल मालवाहू गाडीत घालून चोरून नेला असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरून पारनेर पोलिसांनी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१९ (१), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पारनेरचे पो.नि. संतोष खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ. गायकवाड हे या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

## कोयत्याचा धाक दाखवून महिलेचे सोन्याचे दागिने लुटले; गुन्हा दाखल

नगर – रात्री घरात झोपलेल्या एका ६० वर्षीय वृद्ध शेतकरी महिलेला घरात घुसून कोयत्याचा धाक दाखवत चार अज्ञात चोरट्यांनी ९६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लुटून नेल्याची घटना पारनेर तालुक्यातील पाडळी रांजणगाव येथे २५ जून रोजी रात्री ११.४० वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या संदर्भात अलका गुलाबराव करंजुले (वय ६०, रा. पाडळी रांजणगाव, ता. पारनेर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी अलका करंजुले या घरात झोपलेल्या असताना चार अनोळखी चोरटे त्यांच्या घरात घुसले. चोरट्यांनी हातातील कोयता घेऊन फिर्यादींना जीवे मारण्याचा धाक दाखवला. त्यानंतर चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे गंठण आणि कानातील कर्णफुले जबरदस्तीने ओरबाडून घेतली. दागिने वेगाने ओरबाडल्यामुळे वृद्ध महिलेच्या कानाला गंभीर दुखापत झाली असून रक्तस्त्राव झाला आहे. चोरट्यांनी एकूण ९६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

चोरी केल्यानंतर आरोपींनी एवढ्यावरच न थांबता, घराबाहेर उभी असलेली 'होंडा शाईन' या दुचाकी गाडीची देखील मोठ्या प्रमाणावर तोडफोड करत नुकसान केले. अलका करंजुले यांनी २६ जून रोजी सकाळी सुपा पोलीस ठाण्यात जाऊन फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चार चोरट्यांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४), ३२४(४), आणि ३(५) अन्वये जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कोठुळे हे करत आहेत.

## राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा जागर आवश्यक

### अशोक सिब्बल


समाजकल्याण विभागाच्या सहायक आयुक्त कार्यालयातील सभागृहात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना अशोक सिब्बल आदी.

नगर – राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने लोकराजा आणि तत्त्वज्ञ होते. लोककल्याणाची भूमिका त्यांनी कायम जोपासली आणि त्यानुसार अनेक लोकहितकारी निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी केली. आजच्या काळात राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे स्मरण, जतन आणि प्रसार करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन प्रमुख व्याख्याते अशोक सिब्बल यांनी केले.

समाजकल्याण विभागाच्या सहायक आयुक्त कार्यालयातील सभागृहात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, विशेष अधिकारी सावित्रा लबडे, सहाय्यक लेखाधिकारी संदीप देठे, रेनाविकार विद्यालयाचे प्राचार्य राजेश भालसिंग, बार्टीचे वरिष्ठ संशोधन अधिकारी दिलावर सय्यद आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रमुख व्याख्याते अशोक सिब्बल म्हणाले, सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून काम करणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांचा इतिहास प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचे स्मरण आणि आचरण आजच्या काळात अधिक आवश्यक आहे. त्यांनी वैचारिक प्रबोधनाचा वारसा समाजाला दिला. सर्वधर्मसमभावाचा संदेश त्यांनी केवळ दिला नाही, तर तो प्रत्यक्ष कृतीतूनही सिद्ध केला.

सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून शिक्षणाचा विस्तार, महिलांच्या सक्षमीकरणासाठी कायदे व धोरणे, आरक्षणाची अंमलबजावणी, सर्व धर्मीयांना समान रोजगाराच्या संधी, आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता, सहकारी संस्थांची उभारणी, औद्योगिक विकासाला चालना तसेच क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्राच्या प्रगतीसाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. समानतेच्या तत्त्वावर सर्वांना संधी उपलब्ध करून देण्याचा त्यांचा दृष्टिकोन आजही मार्गदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्य राजेश भालसिंग म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून दरवर्षी विविध उपक्रमांनी साजरी केली जाते. ते समाजातील दुर्बल व वंचित घटकांचा आधारस्तंभ होते. बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत समाजहिताचे आचरण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

सूत्रसंचालन शिवानी शिंगवी यांनी केले, तर आभार प्रदर्शन विशेष अधिकारी सावित्रा लबडे यांनी केले. कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी–कर्मचारी, विविध शाळांतील विद्यार्थी–विद्यार्थिनी, बार्टीचे समतादूत तसेच नागरिक उपस्थित होते.

### समता दिंडीस उत्स्फूर्त प्रतिसाद

राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त समता दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत दिंडीस प्रारंभ झाला.

या दिंडीत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी–विद्यार्थिनी, अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक सहभागी झाले असून दिंडीस प्रतिसाद लाभला.

## आनंदऋषीजी योगा सेंटर

### आनंदयोग मधील योग साधकांचे अभिप्राय

मी गेली आठ वर्षापासून आपल्या योग क्लासला नियमित येत आहे. कधी कधी खाडे होतात. पण मी जर एक दिवस जरी नाही आलो तरी मला करमत नाही. येथे मला अनिल मेहेर सर, पडोळे सर, सिकची सर, नवले सर तसेच इतर योग साधकांचे मार्गदर्शन मिळत आहे.

अनिल मेहेर सर हे खूप साध्या व सोप्या भाषेत खुप चांगले योग विषयक मार्गदर्शन करतात. त्यांचे मार्गदर्शन मला आयुष्यात खूप उपयोगी ठरले आहे. मला योग करायला येण्यापासून मला फक्त काही किरकोळ कारणासाठी दवाखान्यात जावे लागले पण योगामुळे मला कुठलाही आजार नाही.

मला योग केल्यामुळे माझा स्वभाव बदलला. विचार बदलला. योगामुळे माझे आयुष्यच बदलून गेले. मी पूर्वी खूप लाजरा आणि चंचल होतो. कुणाबरोबर बोलायला लाज वाटायची. पण आज योगामुळे मला दिवसभर प्रसन्न वाटते. कितीही काम केले तरी कंटाळा येत नाही.

योगा क्लासमुळे सकाळी लवकर उठण्याची सवय लागली. आपले मन शांत आणि प्रसन्न राहते. आपल्या योग क्लासमध्ये योगासन, प्राणायाम, झुंबा डान्स, हास्य मेडीटेशन, नारायण रेकी इ. बरेच ॲक्टीव्हीटी होतात. त्यामुळे दिवसभर आपले शरीर व मन प्रसन्न राहते.

आपल्या योग क्लासची वार्षिक सहल पण जाते. त्यामुळे आम्हांला खूप आनंद होतो. आपण आपले नातेवाईक किंवा अन्य कोणाबरोबर जी गोष्ट शेअर करु शकत नाही ते आपण इथे योग क्लासमधील सहकागययांबरोबर निःसंकोचपणे बोलू शकतो.



त्यामुळे मी आपले योगगुरु अनिल मेहेर सर, सिकची सर, श्री. पडोळे सर, नवले सर तसेच इतर सहकागययांचे खूप खूप आभार मानतो.

शेवटी मी हे सांगू इच्छितो की प्रत्येकाने नियमितपणे योगासन, प्राणायाम करावे

**– सुशिल शिंगवी,** सहकार सभागृह रोड, अहिल्यानगर

